७० वर्षे
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# अमराठी चालकांना मराठीचे धडेही देणार : प्रताप सरनाईक

## परिवहन विभाग १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान विशेष पडताळणी मोहीम राबविणार



मुंबई (दै. संध्या)

राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने १ मे ते १५ ऑगस्टदरम्यान विशेष पडताळणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेचे नेतृत्व अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या 4 सदस्यीय समितीकडे सोपविण्यात आले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर तसेच अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड उपस्थित होते.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत सर्व संघटनांनी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. "महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, तर मराठी भाषा येणे आवश्यक आहे," ही भूमिका सर्वांनी मान्य केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील सर्व ५९ आरटीओंना १ मेपासून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, या अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई केली जाणार आहे. मात्र, केवळ मराठी भाषा येत नाही या कारणावरून परवाना रद्द केला जाणार नसून, इतर कायदेशीर तरतुदींनुसारच कारवाई केली जाईल. मीरा-भाईंदर येथे राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेचा संदर्भ देत मंत्री सरनाईक म्हणाले की, एकूण ३४४३ रिक्षांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी ५६५ चालकांना मराठी भाषेचे ज्ञान सिद्ध करता आले नाही. तथापि, या चालकांनी मराठी भाषा शिकण्याची तयारी दर्शविली आहे. अतिरिक्त परिवहन आयुक्त गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समिती दररोज तसेच साप्ताहिक पातळीवर या मोहिमेचा आढावा घेणार असून, तपासणी अहवालांच्या आधारे पुढील कारवाईसंदर्भात आरटीओंना निर्देश देणार आहे. या समितीच्या माध्यमातून संपूर्ण मोहिमेचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी सुनिश्चित केली जाणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

मराठी शिकण्यासाठी इच्छुक चालकांसाठी आरटीओ कार्यालयांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, 'कोकण मराठी साहित्य परिषद' आणि 'मुंबई मराठी साहित्य संघ' यांच्या सहकार्याने प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच मराठी शिकण्यासाठी पुस्तिका व ई-पुस्तिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मराठी भाषा शिकलेल्या चालकांना राज्य शासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार असून, परवाना नूतनीकरण करताना हे प्रमाणपत्र आवश्यक राहील, अशी माहितीही त्यांनी दिली. "मराठी शिकण्याची तयारी दर्शविणाऱ्या चालकांना संधी देणे ही राज्याची परंपरा आहे; मात्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही," असा इशाराही मंत्री सरनाईक यांनी दिला. या १०० दिवसांच्या मोहिमेनंतर १६ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वंकष अहवाल सादर करण्यात येणार असून, त्यानुसार पुढील धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी शेवटी स्पष्ट केले.

## दादांसाठी लढणाऱ्या अमोल मिटकरींना संधी द्या : रोहित पवार

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्यात येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या संभाव्य उमेदवारांसंदर्भात चर्चा सुरू असताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्या काकी आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भावनिक आवाहन केले आहे. पक्षातील नेत्यांच्या मुलाला किंवा पुतण्याला संधी देण्यापेक्षा अजितदादांसाठी लढणाऱ्या अमोल मिटकरी यांना संधी द्या, असे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक होणार आहे. या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. बैठकीत विधानपरिषद निवडणूकी करीता इच्छुक उमेदवारांच्या नावांवर चर्चा होणार आहे. माजी खासदार संजय नाना काकडे यांचे सुपुत्र विक्रम काकडे, सुनील तटकरे यांचे चिरंजीव अनिकेत तटकरे, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष सुरेश बिराजदार आदी नेत्यांच्या नावांची चर्चा सुरू असताना विधान परिषदेची मुदत संपत असलेल्या अमोल मिटकरी यांचे नाव मात्र स्पर्धेत नाही. अजितदादा यांच्यासाठी आवाज उठवणाऱ्या अमोल मिटकरी यांच्या नावाची चर्चा नाही यावर आमदार रोहित पवार यांनी मिटकरी यांचे नाव सुचवल्यामुळे पक्षात या संदर्भात जोरदार चर्चा आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




## महाराष्ट्रातील हस्तलिखित दस्तऐवजांच्या नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगासमोर आणावा

मुंबई (दै. संध्या)



- सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार
- हस्तलिखित दस्तऐवज डिजिटल नोंदणीसाठी 'हर घर दस्तक' मोहीम

हस्तलिखित दस्तऐवजांच्या स्वरूपात असलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने डिजिटल नोंदणीचा उपक्रम सुरू केला आहे. या नोंदणीसाठी 'हर घर दस्तक' ही विशेष मोहीम हाती घेण्यात येत आहे. या मोहिमेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या हस्तलिखित दस्तऐवजांच्या ऑनलाईन नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगासमोर आणावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी दिले. पू. ल. देशपांडे कला अकादमीच्या सभागृहात याबाबत आयोजित बैठकीत मंत्री ॲड शेलार बोलत होते. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, संचालक विभीषण चवरे, उपसचिव श्री सामंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी बैठकीत सहभाग घेतला. मंत्री ॲड आशिष शेलार म्हणाले, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, देशभरातील हस्तलिखित दस्तऐवजांचे जतन आणि डिजिटलायझेशन करणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी 'ज्ञानभारती ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून राज्यातील हस्तलिखित दस्तऐवज डिजिटल स्वरूपात जतन केले जाणार आहेत. यामुळे भारताचा प्राचीन आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे. येत्या १ मे रोजी 'महाराष्ट्र दिना'चे औचित्य साधून, राज्यातील सर्व ग्रामसभेत हस्तलिखित नोंदणीचा विषय प्राधान्याने मांडण्याचे निर्देशही मंत्री ॲड शेलार यांनी देत गावपातळीवरील हस्तलिखित स्वरूपातील स्थानिक वारसा जतन करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगितले.

# लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी

लातूर (दै. संध्या)

यंदाच्या उन्हाळ्यातही एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडक उन्हाचा कहर जाणवत असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान चांगलंच वाढलं आहे. उष्माघातामुळे काही ठिकाणी मृत्यू झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. लातूर जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून आज आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे 75 वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहोचला आहे. मृत शेतकऱ्याचे नाव त्र्यंबक नारायण बेळंबे असे असून दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात जनावरांसाठी चारा कापत असताना अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. त्यांना तात्काळ पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी जिल्ह्यात उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या तीन घटना समोर आल्या होत्या. औसा तालुक्यातील एरंडी गावात 25 वर्षीय महेश लिंबाजी इंगोले या तरुणाचा शेतातील कामावरून घरी आल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला होता. तर, औसा तालुक्यातील गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आणखी एका घटनेत औराद शहाजनी येथे 60 वर्षीय शेतकऱ्याचाही प्रखर उन्हामुळे मृत्यू झाला होता. गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान 40 ते 41 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. औराद शहाजानी भागात हवामान केंद्रावर 43 अंश सेल्सिअस पर्यंत तापमानाची नोंद झाली आहे. तीव्र उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना विशेष धोका निर्माण झाला आहे.




७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू, अकोल्यात सर्वाधिक ४७ अंश तापमान

### अकोल्यात ४७ अंश तापमानाची नोंद

दरम्यान, प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून नागरिकांना अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे, हलके व सैल कपडे परिधान करावेत आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. विदर्भात राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून अकोल्यात तापमान 47 अंश सेल्सियसपर्यंत पोहोचल्याची नोंद आहे. अमरावतीमध्ये 45.2 तर वर्ध्यात 45.0 अंश तापमानाची नोंद झाली आहे.

ब्रेकिंग न्यूज

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती जागेबद्दल १५ दिवसात अहवाल

मुंबई (दै. संध्या) : पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या अखत्यारीतील गोशाळेचा विस्तार करण्यासाठी यमाई तलावाजवळ आवश्यक असलेली जमीन मंदिर समितीच्या नावे करण्याबाबतचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत, या जमिनीबाबतचा नवीन आणि सुधारीत प्रस्ताव १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. बैठकीस महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह पंढरपूर संस्थानचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, भास्कर गिरीबाबा, माधवी निगडे, सोलापूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी गणेश निराळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या १२ हेक्टर जागेवर सध्या गोशाळा कार्यरत आहे. वाढत्या गरजा लक्षात घेता, मंदिर समितीने अतिरिक्त ३.१२ हेक्टर जागेची मागणी केली होती.

## कृषि मंत्री दत्तात्रय भरणे : कृषि निविष्ठा विक्री व्यवसायिकांचा संप मागे घेण्याबाबत सकारात्मक चर्चा

# राज्यातही खते लिंकिंग बंद करणेबाबत निर्णय घेणार

मुंबई (दै. संध्या)



ज्या कंपन्यांकडून अनुदानित खते विक्रीचा अधिकार देण्यात आलेला आहे, त्यांना विनाअनुदानित खते व कृषी निविष्ठा विक्री करता येणार नाही, अशा स्वरुपाचा निर्णय उत्तर प्रदेशात झाला आहे. तसेच रासायनिक खतांचा पुरवठा करताना होणारे लिंकिंग बंद करणेबाबत उत्तरप्रदेशने जाहीर केलेल्या आदेशाच्या धर्तीवर राज्यात देखील निर्णय घेतला जाईल, असे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. तसेच राज्यातील कृषि निविष्ठा विक्री व्यवसायिकांच्या विविध प्रश्नांवर घेतलेल्या भूमिकेमुळे २७ एप्रिलपासून सुरू असलेला संप शेतकऱ्यांच्या हितासाठी मागे घेण्याबाबत या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून संप मिटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मंत्रालय परिषद सभागृह येथे कृषि निविष्ठा विक्री व्यवसायातील अडचणीबाबत माफदा संघटनेचे प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत कृषि मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार राजेश बकाने, ऑनलाईन कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषि आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक सुनिल बोरकर, माफदा संघटनेचे विनोद तराळ पाटील, ऑल इंडियाचे अध्यक्ष मनमोहन कलंतरे यासह संघटनेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, उत्तरप्रदेशमध्ये ज्या खत उत्पादक कंपन्या स्वतः तयार केलेले खत विकतात, त्याच प्रकारचा कायदा महाराष्ट्रातही लागू केला जाणार आहे. शेजारील राज्यातून येणाऱ्या अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाण्याविरुद्ध कडक कारवाई करण्यासाठी केंद्राला प्रस्ताव दिला जाईल, तसेच गृह विभाग आणि प्रत्येक पोलीस विभागाला पत्र पाठवून कडक कारवाई करण्याची व्यवस्था करण्यात येईल. केंद्र सरकारने बियाण्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संनियंत्रणासाठी साथी पोर्टल विकसित केले आहे.

मंत्री भरणे म्हणाले की, हा पोर्टल बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपन्या या स्तरावर राबविणे ही सर्वांसाठी एक चांगली यंत्रणा आहे आणि याचा योग्य वापर सर्वांनी करावा. विक्रेत्यांना येणाऱ्या अडचणींबाबत शासन नेहमीच सकारात्मक भूमिका घेणार आहे. आवश्यकतेनुसार पंधरा दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे कालावधी वाढवता येईल आणि विक्रेत्यांच्या अडचणींवर मार्ग काढला जाईल.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ई-पॉस वापरकर्त्यांवर तात्पुरती स्वरूपात कारवाई केली जाणार नाही. राज्यातील कृषि निविष्ठा संदर्भातील विविध प्रश्नांबाबत केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेऊन मार्ग काढला जाईल.विक्रेत्यांनी बियाणे पुरवठादार कंपन्यांकडून सीलबंद पॅकेजिंगमध्ये खरेदी करून शेतकऱ्यांना त्याच स्वरूपात विक्री केली असल्यास, तपासणीमध्ये बियाणे, रासायनिक खते किंवा किटकनाशकांचे सॅम्पल फेल झाल्यास, हरियाणा राज्याने ज्या प्रकारे विक्रेत्यांना आरोपी न करण्याचा निर्णय घेतला त्याचा अभ्यास करुन महाराष्ट्रात पुढील निर्णय घेतला जाईल. तसेच, मुदतबाह्य किटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत घेऊन योग्य तो निर्णय घेण्यासाठी माफदा व विविध कंपन्यांसोबत चर्चा केली जाईल.




## अनुसूचित जाती उपवर्गीयकरणावर ११ मे रोजी मुंबईत सर्वपक्षीय राज्यव्यापी बैठक

मुंबई (दै. संध्या)

- व्यापक आंदोलनाचा इशारा

राज्यात अनुसूचित जाती उपवर्गीयकरणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ११ मे रोजी मुंबईत सर्वपक्षीय व सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत पुढील धोरण ठरवून राज्यभर दौरा आणि व्यापक आंदोलनाबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती रिपब्लिकन आंबेडकरीवादी नेत्यांनी दिली.

मुंबईतील रिपब्लिकन पक्षाच्या खोब्रागडे (CST) मुख्य कार्यालयात होणाऱ्या या बैठकीसाठी विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी तसेच सामाजिक संघटनांना निमंत्रित करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे. यापूर्वी झालेल्या बैठकीत तानसेनभाई ननावरे, भाऊ निर्भवणे, दिलीपदादा जगताप, अच्युत भोईटे, नितीन मोरे, संजय कांबळे, भागवत कांबळे, विश्वनाथ कांबळे, आनंद कांबळे, शाम वाडकर, विक्रम कांबळे आदी नेते उपस्थित होते. राज्य सरकारकडून उपवर्गीयकरणासंदर्भात हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरू असून, ३० एप्रिलपर्यंत सादर करण्यासाठी एक अभ्यासपूर्ण नमुना तयार करण्यात आल्याचे बैठकीत सांगण्यात आले. हा नमुना अभ्यासपूर्ण असल्याने तो सादर करण्यास हरकत नसल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. नेत्यांनी उपजातीय वर्गीकरणामुळे समाजात तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करत सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्याची गरज अधोरेखित केली. कोणत्याही एका घटकाचे नुकसान होऊ नये, यासाठी राज्यव्यापी जनजागृती दौरा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, ११ मे रोजी होणाऱ्या बैठकीकडे राज्यभरातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले असून, या बैठकीतून पुढील आंदोलनाची दिशा निश्चित होणार आहे.

## संपादकीय

# मराठी बोलायची कोणी?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते. राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत! निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे! भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे.

## संस्कृत सुभाषित

व्यायाम: स्थैर्यकराणाम्

अर्थ – शरीराला स्थैर्य आणणे म्हणजे शरीर बळकट आणि मजबूत करणे. शरीर बळकट असेल तर दीर्घायुष्य मिळते. त्यातून शरीराला स्थैर्य मिळते.

## गुरु वचन

### परमेश्वराचे नामस्मरण करा

मानवी शरीर परमेश्वराच्या कृपेने आणि केवळ परमेश्वराच्या प्राप्तीसाठीच मिळते. यासाठी सर्व काम सोडून परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. ज्यांचे वय जास्त झाले आहे, त्यांना परमेश्वराचे नामस्मरण करणे आहेच, पण ज्यांचे वय कमी आहे, त्यांनीही स्वच्छ मनाने परमेश्वराचे नामस्मरण करावे लागणार आहे. सृष्टीतील सर्व कामे करायची आहेत पण आपला मुख्य हेतू आणि लक्ष्य केवळ परमेश्वराला प्राप्त करणे असावे. अस्तित्त्वामध्ये सत्ता एका परमात्म्याची आहे. संसाराकडे ध्यान दिले ते सर्व नष्ट होणार आहे आणि निरंतर नष्ट होत राहील. आपण आपल्यापरीने पहायला हवे की, आपण जेव्हा जन्मलो त्यावेळी शरीराची कशी अवस्था होती व आज कशी आहे. संसार नेहमी बदलणारा आहे तर परमात्मा कायमस्वरुपी आहे. परमात्मा आपला आणि आपण परमात्म्याचे आहोत. या दृढता असायला हवी. एखादा लहान मुलाला आईविषयी विचारले तर तो म्हणते ती माझी आई आहे. परंतु आई का आहे याचे तो उत्तर देत नाही. त्याच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की आई त्याची का आहे. आई त्याची आहे याविषयी काही संशय नाही. अशाप्रकारे आपणही संशय करु नका आणि ही गोष्ट पूर्ण विश्वासाने निश्चित करा की, परमेश्वर माझा आहे आणि परमेश्वराशिवाय दुसरे काहीही माझे नाही. कारण ते बाकी सर्व तुम्हाला सोडून जाणार आहेत. ज्याच्याविषयी आपण चिंतेत राहतात. पैसे, घर, जमीन सर्वकाही आहे तिथेच राहणार आहे आणि त्याचे स्मरणही राहणार नाही. स्मरण राहील तर परमेश्वराचे. जर आपल्याला स्मरण राहत असेल तर तुम्ही सांगा आपण या जन्मापूर्वी कोठे होता. आपले आई–वडिल, भाऊ–बहीण, स्त्री–पुरुष आदी कोन होते, आपले घर कोणते होते. जसे पूर्वजन्माची आठवण नाही तसेच या जन्माचीही आपल्याला आठवण राहणार नाही. ज्याची आठवणही होणार नाही, त्यासाठी आपण विनाकारण परेशान होत आहात.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 4 | | 8 | | 2 | |
| | 5 | 4 | 6 | | 7 | | | 3 |
| 9 | 6 | | 1 | | | | | |
| | 8 | 7 | 2 | | | | | 5 |
| | | 9 | | 7 | | 8 | | |
| 3 | | | | | 4 | 7 | 9 | |
| | | | | | 5 | | 4 | 1 |
| 6 | | | 7 | | 2 | 3 | 8 | |
| | 9 | | 8 | | 6 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १३३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 7 | 2 | 6 | 8 | 9 | 5 | 4 |
| 5 | 2 | 9 | 3 | 1 | 4 | 8 | 6 | 7 |
| 8 | 4 | 6 | 9 | 5 | 7 | 3 | 1 | 2 |
| 4 | 8 | 3 | 1 | 2 | 9 | 6 | 7 | 5 |
| 7 | 1 | 2 | 5 | 8 | 6 | 4 | 3 | 9 |
| 9 | 6 | 5 | 7 | 4 | 3 | 2 | 8 | 1 |
| 6 | 7 | 8 | 4 | 9 | 5 | 1 | 2 | 3 |
| 2 | 5 | 4 | 8 | 3 | 1 | 7 | 9 | 6 |
| 3 | 9 | 1 | 6 | 7 | 2 | 5 | 4 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९९१ – बांगलादेशात चक्रीवादळात १,३८००० लोकांच्या मृत्यू झाला तर १० दशलक्ष लोक बेघर झाले.
- २००६ – सौदी अरबच्या राहेली येथे एक बस खड्ड्यात कोसळल्याने २८ जण ठार झाले.
- २००७ – ऑस्ट्रेलियाने सलग तिसऱ्यांदा व एकुण चौथ्यांदा विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला. त्याने श्रीलंकेला नमविले.
- २००७ – ऑस्ट्रेलियाने विश्वचषकात सलग तिसरे विजेतेपद मिळविल्यानंतर क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची घोषणा केलेला गोलंदाज ग्लेन मॅक्ग्रा याची प्लेयर ऑफ द टूर्नामेंट म्हणून निवड करण्यात आली.

### राष्ट्रीय

- २००८ – हरभजन–श्रीसंत थप्पड प्रकरणावर वक्तव्या करणाऱ्या पंच अमित साहेबा यांना २ सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले.


### जन्म

- १९२५ – जॉन कोम्पटन, सेंट लुसीयनचे पंतप्रधान.
- १९३३ – मार्क इस्केन्स, बेलजियमचे पंतप्रधान.
- १९३६ – जुबीन मेहता, बॉम्बे सिमफोनी ऑकेस्ट्राचे संचालक.
- २००३ – मौड भेन, नार्वेची राजकुमारी.
- २००७ – इंफाँटा सोफिया, स्पेनची राजकुमारी.

### निधन

- १७९३ – जॉन मिचेल, इंगषलश शास्त्रज्ञ.
- १९९८ – हॉल लेको, कॅनाडीयन आईस हॉकीपटू व प्रशिक्षक.
- २००६ – तिलकराम सहरावत, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक.
- २००७ – डिक मोट्ज, न्यूझीलँडचा क्रिकेटपटू.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १३४



**आडवे शब्द**

१. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध
४. चाणक्यनीती
१०. लगत, शेजारी–शेजारी
११. समूह, संच
१२. शेतावरील कर
१३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा
१५. चुलता
१६. घोड्याला आवर घालणारी वादी
१७. उष्ण, कढत
१९. नेमाने वारी करणारा
२०. धनुष्य, नावाडी
२१. साहित्यातील नऊ भावना
२४. सरळ लांब वासा
२५. यज्ञ
२६. फार उष्ण व थंड नसलेले
२८. अनाथांना आश्रय देणारी संस्था
२९. निरर्थक बडबड
३१. छंद, आवाज
३२. 'अपना हाथ ----!'
३३. सध्याचे युग
३४. मोठी बहीण
३५. वर्ष, सन
३६. उजाड
३८. कान व डोळे यामधील भाग
४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार– --- सरकार
४२. कौसल्यापुत्र
४३. जनावरांचा समूह
४४. हिंमत, धैर्य
४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र
४७. दुप्पट (इंग्रजी)
४९. मध्यस्थ
५१. हिंदीत कीव, करूणा
५३. शर्विलक
५४. नोकर
५६. परग्रहावर जाणारे वाहन
५९. मेहरबानी
६०. बरोबर आलेली मंडळी
६३. जमीनजुमला
६६. श्रीमंत
६७. फोडामधील द्रव
६९. अवाढव्य, प्रचंड
७१. धैर्य
७२. मोठा समुद्र
७३. सूत काढण्याचे साधन
७४. वरपांगी, दिखाऊ

**उभे शब्द**

१. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण
२. टक, दृष्टी
३. सनसनाटी
४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा
५. मळलेला
६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
७. अस्थिर, डळमळीत
८. अर्पिलेली वस्तू
९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश
१२. क्षुधावर्धक गरम पेय
१४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा
२०. हिंदीत सावली
२१. रोख, २२. नवरदेव
२३. पोरका
२४. सक्तमजुरीची शिक्षा
२७. बंदी
२८. उपासमारीची स्थिती
३०. जम
३३. चिवचिवाट
३४. संगीतातील ठेका
३५. वर्षानुवर्षे
३७. सारखा
३८. कपडालत्ता
३९. गार, थंड
४१. संगीतातील एक राग
४४. अगम्य, ४५. नूतन
४८. फणसाचा एक प्रकार
५०. कीव, करूणा
५२. रत्न
५५. गव्हाचे जाडसर पीठ
५७. लग्नातील नवरा मुलगा
५८. देशी दारू
६१. सैन्यातील एक हुद्दा
६२. सामान
६४. बातमीदार
६५. मुलायम
६८. षट, पाचनंतरचा आकडा
६९. नंतर
७०. पराभव, माळ
७१. प्रामाणिक

**जम्बो शब्दकोडे क्र. १३३ चे उत्तर**

आडवे उत्तर
१.नवराबायको ५.साधासामग्री ९.पोत ११.कार १२.यजमान १३.याग १५.रणगाडा १८.वजाबाकी २१.वसुदेव देवकी २३.जर २४.जनक २६.लव २८.सालस ३०.डर ३२.नमस्कार ३५.गराडा ३७.कसाई ३८.पाला ४०.डळमळीत ४२.माया ४३.ललना ४४.पात ४५.नाक ४६.भू ४७.बाग ४९.नवरात्र ५०.डेरा ५२.अनाथ ५४.जलपान ५६.सर ५८.कचरा ५९.करतल ६३.लपणे ६५.जननमरण ६६अ.ददात ६८.करवत ७०.सवालजबाब ७२.सरबत ७४.चिड ७५.वरळी ७६.कर ७७.पत ७८.रोगी ७९.रव ८०.पाडाव ८१.टकळी

उभे उत्तर : १.नकार २.वरण ३.बाकडा ४.कोयता ५.सामनसुमान ६.धन ७.साया ८.मग १०.तपकीर १४.राजा १६.गायक १७.पावमस्का १८.वकील १९.बाज २०.सल २२.वसा २४.जड २५.नरकयातना २७.वनपाल २९.सगळीकडे ३१.साईबाबा ३३.रस्सा ३४.रडतराऊत ३६.रात ३९.लालनपालन ४१.मना ४४.पाव ४८.गजराज ५१.रास ५२.अबोल ५३.थकवा ५५.ठो ५७.रडतखडत ५९.करभार ६०.रण ६१.लकेर ६२.मदत ६४.परवानगी ६६.नरबळी ६७.आजवर ६८.कतरण ६९.वहिवाट ७१.बारव ७२.सरडा ७३.बक ७४.चिपळी

## उपदेशकथा

### भगवान

एका फकिराला एकदा स्वप्न पडले. स्वप्नात तो स्वर्गात गेला. तेथे रस्त्यावर मोठी गर्दी झालेली त्याला दिसली. त्या गर्दीतील एकाला त्याने विचारले, एवढे लोक का जमले आहेत? त्या व्यक्तीने सांगितले, आज भगवानांचा जन्मदिन आहे. ते येथून जाणार आहेत. फकिराला आपल्या भाग्याचा हेवा वाटला. साक्षात भगवानाचे दर्शन घडणार. थोड्या वेळाने एका उमद्या घोड्यावरुन एक राजबिंडा तरुण आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. त्याला पाहून फकिराने विचारले, हेच का ते भगवान? ती व्यक्ती म्हणाली, नाही हे भगवान नाहीत. हे राम आहेत. त्यांना मानणारे लोक त्यांच्यामागून जात आहेत... याच पद्धतीने येशू, बुद्ध, महावीर... सर्वजण येऊन गेले. भगवानांची वाट पाहता पाहता मध्यरात्र झाली. सारे लोक कंटाळून निघून गेले. आणि त्या निर्मनुष्य रस्त्यावरुन एक म्हातारा एकटाच आला. फकिराने त्याला विचारले, आपणच भगवान? म्हातारा म्हणाला, हो. फकिराने विचारले, मग आपल्यामागून कोणीच कसे येत नाही? डोळ्यात अश्रू आणत तो म्हातारा म्हणाला, सारे राम, महावीर, बुद्ध, येशूबरोबर गेले. जो कोणाबरोबर जात नाही, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो.

## : SMS :

Sagaai hui...
Shadi Hui...
Biwi ghar main aayi...
Ghar SWARG
ban gaya...
Aur main...
SWARGWASI...

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा :उत्तर रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे.

**तुळ :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण परिश्रम केल्याने समस्या दूर होतील. समाधानी राहिल्याने कार्यक्षमतेत वाढ होईल.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पश्चिम घरगुती वस्तुंची खरेदी कराल. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट घडून येईल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण आपल्या काम वेळेवर न होण्याची शक्यता आहे. जीवनसाथीशी वैचारिक मतभेद होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग: भूरा, शुभ दिशा:पश्चिम मुलांची प्रगती राहील. धार्मिक कार्यक्रमाच्या समारंभाचे आयोजन कराल. अडकलेला पैसा मिळेल.

**धनु :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** शुभ रंग: ज़ांभळा, शुभ दिशा: पश्चिम अचानक फायदा मिळण्याचे योग आहेत. नौकरीमध्ये मान सन्मान मिळेल.

**मकर :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.

**सिंह :** शुभ रंग: जांभळा, शुभ रंग: उत्तर वाद–विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील.

**मीन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:हस्त २४:१६:०८+ |
| २९ एप्रिल २०२६ | योग:हर्षण २०:५१:०० |
| बुधवार | करण:कौलव ०७:१९:१३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल १९:५१:५३ |
| वैशाख शके | सूर्य:मेष |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कन्या |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्काद |
| मास– वैशाख | तारीख – ११ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | प्रदोष |
| तिथि:त्रयोदशी १९:५१:५३ | |

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.८ | २८.६ |
| अहमदनगर | ३८.५ | २७.६ |
| अकोला | ४३.७ | २९.३ |
| अमरावती | ४१.५ | २९.३ |
| बीड | ४५.८ | ३२.१ |
| भंडारा | ४६.१ | ३१.९ |
| बुलढाणा | ३९.६ | २४.१ |
| चंद्रपूर | ४७.५ | ३०.८ |
| चेन्नई | ४५.१ | ३२.६ |
| नवी दिल्ली | ३९.७ | २७.८ |
| धुळे | ४०.८ | २८ |
| गोंदिया | ४४.८ | ३०.९ |
| जळगाव | ४२.२ | २८.५ |
| कोल्हापूर | ३९.६ | २४.६ |
| लातूर | ३८.८ | २७.८ |
| मुंबई | ४०.७ | ३४ |
| नागपूर | ४३.९ | ३१.६ |
| नांदेड | ४२.१ | ३०.३ |
| नंदूरबार | ४० | २९.३ |
| नाशिक | ३८.१ | २५.७ |
| पुणे | ३५.३ | २६ |
| पंढरपूर | ३९.५ | २८.९ |
| सातारा | ३८.२ | २५.१ |
| सांगली | ३९.६ | २५.८ |
| सोलापूर | ४०.८ | ३०.५ |
| वर्धा | ४५.३ | ३०.९ |


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ‘विकसित भारत’ घडविण्यासाठी नवोपक्रम व संशोधन महत्वाचे : राज्यपाल जिष्णू देव वर्मा

## असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या राष्ट्रीय कुलगुरू महासभेचे राज्यपालांच्या हस्ते उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

देशाला २०४७ पर्यंत ‘विकसित भारत’ घडविण्यासाठी नवोपक्रम, संशोधन आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था अत्यावश्यक असून या माध्यमातून विकासाचे लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.



असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज( एआययू )च्या १०० व्या वार्षिक महासभेचे व “ज्ञान आणि नवोपक्रमातून स्वावलंबी भारत घडवणे” या विषयावर पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे आयोजित राष्ट्रीय कुलगुरू परिषदेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला एआययूचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनय कुमार पाठक, महासचिव डॉ. पंकज मित्तल, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, उपकुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे , प्र-कुलगुरू डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. स्मिता जाधव आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, विद्यापीठांना राष्ट्रीय व जागतिक स्तरावर प्रगती करताना दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी प्रयत्न वाढवावेत. उच्च शिक्षण संस्थांनी नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे युवक घडवावेत. कौशल्य विकासाला प्राधान्य देत सर्वसमावेशक शिक्षण पद्धती उभारण्याचे आवाहनही राज्यपालांनी केले.

उच्च शिक्षणासाठी ५० टक्के प्रवेश प्रमाण गाठण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. पर्यावरणपूरक विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता व प्रगत तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश यावरही श्री.वर्मा यांनी भर दिला.

एआययूची शताब्दी परंपरा अधोरेखित करताना राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, ही संघटना उच्च शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाची मार्गदर्शक संस्था असून देशातील विद्यापीठांना धोरणात्मक दिशा देत आहे. डॉ. एस. राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन आणि डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांसारख्या दिग्गजांनी घडविलेला शैक्षणिक वारसा आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

महासचिव डॉ. पंकज मित्तल यांनी संघटनेच्या कार्याचा विस्तार स्पष्ट करताना शिक्षण अधिक सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय सहकार्य, संशोधन भागीदारी आणि विद्यार्थी देवाण-घेवाण यामुळे भारतीय शिक्षणाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात “ट्रान्सफॉर्मेशन ऑफ एज्युकेशन”, एआययूच्या १०० वर्षांच्या स्मरणिकेचे तसेच “इंडियन युनिव्हर्सिटी जर्नल” चे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

प्रा. डॉ. विनय कुमार पाठक म्हणाले, आज भारत ‘ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था’ बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून त्याची पायाभरणी विद्यापीठांमधूनच होत आहे. देशाची अर्थव्यवस्था सशक्त असून जागतिक आव्हानांवर मात करत विकासदर सातत्याने उंचावलेला आहे. नवउद्योग, संशोधन आणि पेटंट नोंदणीमध्ये वाढ होत असून मोठ्या शहरांसोबतच लहान शहरांतूनही प्रगतीची नवी केंद्रे निर्माण होत आहेत. विद्यापीठांनी संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकता यांना चालना देऊन ‘विकसित भारत २०४७’ या ध्येयात सक्रिय भूमिका बजावली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. श्री.पाठक यांनी भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील शताब्दी प्रवासाचा आढावा घेतला.

कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी स्वागतपर भाषणात विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले, शिक्षणाचा अंतिम उद्देश समाजसेवा हाच असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत जबाबदार नागरिक म्हणून घडविण्यावर भर दिला जात आहे. संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि समाजाभिमुख उपक्रमांमधून उत्कृष्टतेचा ध्यास घेत विद्यापीठ कार्यरत आहे. जागतिक सहकार्य आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### प्राजक्ता माळीचा पहिल्यांदाच आहिराणी गाण्यावर ठेका!

पुणे (दैनिक संध्या) : सोनी मराठीवरील प्रेक्षकांचा लाडका विनोदी कार्यक्रम “महाराष्ट्राची हास्यजत्रा” आजच्या भागात आणखी रंगतदार होणार आहे. कारण आजच्या भागात पहिल्यांदाच लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी आहिराणी गाण्यावर नृत्य सादर करताना दिसणार आहे. तिच्या या खास परफॉर्मन्सची प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. या खास भागात नव्या आहिराणी गाण्याची टीमही उपस्थित राहणार आहे. यात कलाकार उत्कर्ष शिंदे, विनोद कुमावत, शीतल अहिरराव, तसेच गायक व संगीतकार समीर KS, गीतकार भैय्या मोरे आणि निर्माते गोकुळ पाटील यांचा समावेश आहे. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत रंगणारा हा भाग प्रेक्षकांसाठी खास मेजवानी ठरणार आहे. प्राजक्ता माळीचा आहिराणी ठेक्यावरचा दमदार डान्स आणि हास्यजत्रेच्या कलाकारांची भन्नाट कॉमेडी यामुळे आजचा भाग नक्कीच पाहण्यासारखा आहे. म्हणून पाहायला विसरू नका “महाराष्ट्राची हास्यजत्रा” – आजच, फक्त सोनी मराठीवर आणि या खास मनोरंजनाचा आनंद घ्या!

### 'जय मल्हार' भव्य रांगोळी प्रदर्शनात साकारणार श्री खंडोबा चरित्र



पुणे (दैनिक संध्या) : मल्हारी मार्तंड, खंडोबा, खंडेराया, म्हाळसा पती अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या महादेवाच्या मार्तंड भैरव श्री खंडोबा देवाच्या अवताराचे चरित्र आता रांगोळीच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. बालगंधर्व कलादालन येथे श्रीरंग कलादर्पण फाउंडेशनच्या वतीने अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवावर आधारित ‘जय मल्हार’ या भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात ‘श्री खंडोबा चरित्र’ रांगोळीच्या माध्यमातून साकारण्यात येणार आहे. हे प्रदर्शन दिनांक ३० एप्रिल ते ३ मे २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे, अशी माहिती श्रीरंग कलादर्पण फाउंडेशनचे प्रा.अक्षय शहापूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रदर्शनात भारतातील द्वादश मार्तंड खंडोबा लिंग तसेच जेजुरी खंडोबा मंदिर येथील खंडोबा देवाची मानाची पगडी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन अभिनेते देवदत्त नागे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी श्री मार्तंड देव संस्थान जेजुरीचे विश्वस्त मंडळ, सुप्रसिद्ध रंगावलीकार जगदीश चव्हाण, प्रा. अक्षय शहापूरकर, प्रतीक अथणे, अजित पवार, दिनेश मंची आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विविध प्रकारच्या नाविन्यपूर्ण रांगोळ्यांचा समावेश प्रदर्शनात आहे.

## 'ॲन इव्हिनिंग वीथ ॲकॉर्डियन' मधून घडणार ॲकॉर्डियन विश्वाची जादुई सफर

पुणे (दै. संध्या)

जागतिक ॲकॉर्डियन दिनानिमित्त ॲकॉर्डियन वादक अमित वैद्य यांचा ॲन इव्हिनिंग विथ ॲकॉर्डियन हा विशेष कार्यक्रम शनिवार, दिनांक २ मे रोजी सायंकाळी ५.४५ वाजता कोथरूड येथील एमईएस बालशिक्षण ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ॲकॉर्डियन वादक अमित वैद्य यांनी पत्रकार परिषदेत दिली. दिनांक ६ मे १८२९ रोजी सायरील डेमियन यांनी ॲकॉर्डियन वाद्याचे पेटंट दाखल केले होते. त्या स्मरणार्थ दरवर्षी ६ मे हा दिवस वर्ल्ड ॲकॉर्डियन डे म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर पुण्यात हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमात अमित वैद्य अकॉर्डियन वादन करणार असून त्यांना पद्माकर गुजर (ढोलक) आणि विनोद सोनवणे (ऑक्टोपॅड) साथसंगत करणार आहेत. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते राज कपूर (२०२४), ज्येष्ठ संगीतकार सलील चौधरी (२०२५) आणि ओ. पी. नय्यर (२०२६) यांच्या जन्मशताब्दीनिमित्त हा कार्यक्रम त्यांना समर्पित करण्यात येणार आहे. कार्यक्रमात राज कपूर यांच्या चित्रपटांतील आणि ॲकॉर्डियनचा प्रभावी वापर असलेल्या गाण्यांसह सलील चौधरी व ओ. पी. नय्यर यांच्या निवडक गीतांचे सादरीकरण होणार आहे. या तिन्ही दिग्गजांचा जीवनप्रवास आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांचे योगदान यावर सुहास किर्लोस्कर आपल्या निवेदनातून प्रकाश टाकणार आहेत.

## एससी उपवर्गीकरणाबाबत पुढील सुनावणी ३० एप्रिलला

### पुण्यातील त्रिशरण एन्लायटन्मेंट फाऊंडेशनकडून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल

पुणे (दै. संध्या)

अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत सामाजिक न्याय विभागाने १० एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयात फक्त पाच दिवसांत हरकती नोंदवण्याची मुदत देण्यात आली होती. त्याचबरोबर अनंत बदर समितीचा अहवालही जनतेला उपलब्ध करून देण्यात आला नव्हता. या दोन्ही बाबी अन्यायकारक असल्याचे स्पष्ट करत पुण्यातील त्रिशरण एन्लायटन्मेंट फाऊंडेशनने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. या याचिकेवर आता ३० एप्रिल २०२६ रोजी सुनावणी होणार आहे.

त्रिशरण एनलाइटनमेंट फाऊंडेशनने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या न्यायालयीन मार्ग या सूचनेचे पालन करत तळागाळातील दलित समाजाच्या हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी ही लढाई न्यायालयीन पातळीवर लढवली आहे. फाऊंडेशनचे म्हणणे आहे की, अहवाल सार्वजनिक न करता आणि पुरेसा वेळ न देता घाईघाईने उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबवणे अन्यायकारक व समाजात तेढ निर्माण करणारे आहे. पुढील सुनावणी ३० एप्रिल ला आहे.

फाउंडेशनने दाखल केलेल्या याचिकेत हरकती नोंदवण्यासाठी पाच दिवसांचा कालावधी वाढवून त्याला एक महिन्याची मुदत द्यावी आणि बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा, जेणेकरून तळागाळातील एससी समाजाला त्यावर योग्य आक्षेप नोंदवता येतील, या मुख्य दोन मागण्या करण्यात आल्या होत्या. या याचिकेवर १६ एप्रिल रोजी मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर झालेल्या पहिल्या सुनावणीत फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उदय वारुंजीकर यांनी युक्तिवाद केला. त्यानुसार न्यायालयाने त्रिशरण एन्लायटन्मेंट फाऊंडेशनने सदर समितीकडे एक महिन्याची मुदत वाढ व बदर समिती अहवाल मागणीचे पत्र द्यावे, तसेच समितीने हा अहवाल फाउंडेशनला देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार १७ एप्रिल रोजी समितीचे अध्यक्ष यांना मुदत वाढीचे व अहवाल मिळावा या संदर्भात प्रतिनिधी पाठवून पत्र देण्यात आले.

१६ एप्रिल २०२६ च्या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १८ तारखेला पुन्हा न्यायालयात सुनावणी होणार होती. मात्र, सदर सुनावणीत सरकारी वकिलांनी अहवाल देण्यास विरोध दर्शवला. तसेच अहवाल देण्याबाबत शासनाला बोलण्यासाठी वेळ मागितला. मात्र न्यायालयाने तातडीने प्रेस रिलीज काढून कालावधी वाढवल्याची माहिती किमान तीन वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले. सध्या हरकती नोंदवण्याची मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## ‘गंगा माई की बेटियाँ’चा शिझान खान चाहत्यांच्या प्रेमाने भारावला

पुणे (दै. संध्या)

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘गंगा माई की बेटियाँ’मध्ये शिझान खान (सिद्धू) आणि अमनदीप सिधू (स्नेहा) यांच्या प्रमुख भूमिका असून आपल्या पकड ठेवणाऱ्या कथानकामुळे ह्या मालिकेने सध्या प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या मालिकेतील सिद्धू आणि स्नेहा विभक्त झाल्याचा सध्याचा ट्रॅक चर्चेत आहे. स्नेहा नात्यापेक्षा स्वतःची स्वप्ने निवडून सिद्धूपासून दूर जाण्याचा निर्णय घेते आणि त्यामुळे सिद्धू भावनिकदृष्ट्या खूपच असुरक्षित आणि भावनिक वादळात सापडल्याचे दाखवले गेले आहे. ही तीव्र दृश्ये प्रेक्षकांच्या मनावर खोलवर भिडली असून चित्रीकरणाच्या वेळेस आपल्या डोळ्यांत खरे अश्रु होते असे त्याने सांगितले आणि ऑनस्क्रीन प्रथमच त्याने एवढी भावुक असुरक्षितता साकारली असेही तो म्हणाला.



शिझान खान म्हणाला, “जेव्हा हा ट्रॅक मला पहिल्यांदा सांगितला गेला तेव्हा मला खूप उत्सुकता आणि कुतूहल वाटले की आपण तो पडद्यावर कसा साकारू. सिद्धू आणि स्नेहा फार काळ एकत्र नव्हते, तरी त्यांच्या नात्याची खरी सुंदरता म्हणजे सिद्धूचे स्नेहावर असलेले प्रेम, ज्यामुळे ते अधिक भावनिक होते. मला आठवतंय की शूटिंगदरम्यान सिद्धूसाठी आपल्याला किती वाईट वाटत आहे याबद्दल अमनदीप आणि मी दोघेही बोललो होतो आणि वेगळे होण्याचा हा ट्रॅक चित्रीत करताना जरी मला रडायचे नव्हते तरी माझ्या डोळ्यात अश्रू आले होते.”

प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाबद्दल आपले विचार व्यक्त करताना तो म्हणाला, “मी अभिनय करत नव्हतो, तर केवळ सिद्धूच्या भावना आणि वेदना जगत होतो कारण माझ्यासाठी अभिनय म्हणजे नेहमीच प्रामाणिकपणे त्या क्षणाला अनुभवणे असून केवळ सादरीकरण करणे नाहीये. याआधी मला इतके संदेश कधीच मिळाले नव्हते, ज्यात लोक म्हणाले, ‘सिद्धूने आम्हांला रडवले.’ हा ट्रॅक माझ्यासाठी अत्यंत प्रभावी ठरला कारण पहिल्यांदाच एक अभिनेता म्हणून मला पडद्यावर इतकी भावनिक असुरक्षितता आणि जटिलता दाखवण्याची संधी मिळाली. प्रेक्षकही त्यासोबत इतक्या ताकदीने जोडले गेले याबद्दल मी कृतज्ञ आहे.” हे नाट्य पुढे सरकत असताना, काय सिद्धू आणि स्नेहा दुर्गावतीची (इंदिरा कृष्णन) योजना उघडकीस आणतील की त्यांचे प्रेम तिच्या डावपेचांना बळी पडेल? पहा ‘गंगा माई की बेटियाँ’ दररोज रात्री 9 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## पुणे महापालिकेच्या 'एटीएम'चं पाणी पिण्यास अयोग्य

पुणे (दै. संध्या)

पुणे शहरातील कर्वेनगर परिसरात असलेल्या एटीएममध्ये मिळणारं पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल मनपाच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणी कारवाई करुन शहरातील सर्वच एटीएमची तपासणी करण्याची मागणी क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी केली आहे. खर्डेकर यांनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन दिलं आहे. त्यात ते म्हणतात, गुरुवार व शुक्रवारच्या पाणी बंद मुळे नागरिकांचे हाल होत असताना कर्वेनगरमध्ये मात्र एक वेगळेच चित्र बघायला मिळत आहे. परिसरात एका ठिकाणी पाण्याचे एटीएम मशीन बसविण्यात आले असून अवघ्या एक रुपयात एक लिटर पाणी मिळत होते. या भागात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी असल्यामुळे आणि एका रुपयात शुद्ध पाणी मिळत असल्याने गर्दी होत होती. या पाण्याच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत होते. त्यामुळेच भागाच्या पाणी खात्याच्या कनिष्ठ अभियंता अपर्णा देसाई यांच्याकडे तक्रार केली होती, असं खर्डेकर निवेदनात सांगतात.

या पाणी तपासणी अहवालात सदरील एटीएमचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. मात्र आता याच ठिकाणी ५ रुपयांमध्ये १० लिटर पाणी विक्री केलं जात आहे. अशा पद्धतीने पाणी विक्री करता येते कां? असे पाणी पिल्याने नागरिक आजारी पडल्यास जबाबदार कोण?, शहरात अशा प्रकारच्या पाण्याचे किती एटीएम आहेत व यांना मनपाने रीतसर परवानगी दिली आहे काय? असे प्रश्न संदीप खर्डेकर यांनी दिलेल्या निवेदनातून उपस्थित केले आहेत.

# झी टीव्ही कलाकारांनी साजरा केला ‘वर्ल्ड डान्स डे’

### नृत्य ही अभिव्यक्ती आणि आनंदाची शक्तिशाली कला आहे!



पुणे (दै. संध्या)

जगभरात ‘वर्ल्ड डान्स डे’ हा दिवस नृत्याच्या शाश्वत आणि सर्वव्यापी भाषेचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. ही कला संस्कृती, भौगोलिक सीमा आणि बोलल्या जाणाऱ्या शब्दांच्या पलीकडे जाते. नृत्यामध्ये आनंद, ओढ, दु:ख किंवा उत्सव अशा मानवी भावनांना सहजतेने आणि प्रामाणिकपणे व्यक्त करण्याची दुर्मिळ ताकद आहे. कलाकारांसाठी नृत्य हे अभिव्यक्ती अधिक प्रभावी करण्याचे, व्यक्तिरेखा अधिक खोलवर साकारण्याचे आणि कथाकथन अधिक भावपूर्ण व आकर्षक बनवण्याचे अमूल्य माध्यम ठरते. या निमित्ताने झी टीव्हीवरील कलाकार ‘गंगा माई की बेटियाँ’ मधील अमनदीप सिधू, ‘जाने अनजाने हम मिले’ मधील आयुषी खुराणा, ‘जगद्धात्री’ मधील सायंतनी घोष, ‘लक्ष्मी निवास’ मधील अक्षिता मुद्गल, ‘सरु’ मधील मोहक मटकर आणि ‘तुम से तुम तक’ मधील निहारिका चौक्सी यांनी नृत्य त्यांच्यासाठी काय अर्थ ठेवते याबद्दल मनापासून विचार मांडले.

‘गंगा माई की बेटियाँ’ मालिकेत ‘स्नेहा’ची भूमिका साकारणारी अमनदीप सिधू म्हणाली, “कथ्थक हा नृत्यप्रकार शिकायची इच्छा मी खूप दिवसांपासून बाळगली आहे पण विविध कारणांमुळे ते मला अजून शिकता आलेले नाही. तरीही त्याच्या सौंदर्याचा अनुभव घेणे आणि ते आत्मसात करण्याची माझी मनापासून इच्छा आहे. कथ्थकमधील नजाकत, शिस्त आणि कथाकथन मला फार भावते आणि लवकरच ही यात्रा सुरू करण्याची मला आशा आहे. ‘वर्ल्ड डान्स डे’च्या निमित्ताने मी सर्वांना विशुद्ध आनंदाच्या शुभेच्छा देते कारण नृत्य ही खरी अभिव्यक्ती आणि आनंदाची पराकाष्ठा आहे. त्यात शब्दांच्या पलीकडे हृदयांना जोडण्याची आणि आपल्या आतील विशुद्ध भावनांना जागवण्याची ताकद आहे.” ‘जाने अनजाने हम मिले’ मालिकेत ‘रीत’ची भूमिका करणारी आयुषी खुराणा म्हणाली, “माझ्यासाठी नृत्य म्हणजे विशुद्ध आनंद आणि स्वातंत्र्य आहे, जिथे मला सर्वाधिक जिवंतपणा जाणवतो.

‘तुम से तुम तक’ मालिकेत ‘अनु’ची भूमिका करणारी निहारिका चौक्सी म्हणाली, “नृत्य हे नेहमीच माझ्यासाठी आनंद आणि स्वतःला व्यक्त करण्याचा स्त्रोत राहिला आहे. ते मला स्वतःला मोकळे करण्याची, स्वतःशी प्रामाणिक राहण्याची आणि माझ्या अंतर्गत भावनांशी जोडण्याची संधी देते. मला वाटते की प्रत्येकामध्ये एक नर्तक दडलेला असतो आणि ‘वर्ल्ड डान्स डे’ हा तो स्वीकारण्याचा योग्य क्षण आहे. ते आपल्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि आपल्या स्वतःच्या लयीत आत्मविश्वास शोधण्यास प्रोत्साहित करते.”

‘जाने अनजाने हम मिले’च्या शूटिंगदरम्यान मला अनेकदा नृत्याचे प्रसंग साकारण्याची संधी मिळाली आणि खरं सांगायचं तर जेव्हा आम्हांला नृत्याचे दृश्य शूट करायचे आहे हे कळते, तेव्हा मला खूपच आनंद होतो. त्या क्षणी माझ्या सहकलाकारांसोबत खूप मजा येते. नृत्य मला सहजपणे विविध भावना व्यक्त करण्याची संधी देते आणि माझ्या मते ते जीवनाचा उत्सव आहे, आणि तो माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवासात सुंदरपणे प्रतिबिंबित होतो.”

‘जगद्धात्री’ मालिकेत माया ची भूमिका साकारणारी सायंतनी घोष म्हणाली, “गायन आणि अभिनय हे नेहमीच माझ्या मनाजवळचे राहिले आहेत, पण नृत्य हीदेखील अशी गोष्ट आहे जी मला खूप आनंद देते. नृत्य ही केवळ कला नसून ती संस्कृती आणि कथाकथनाचे प्रतिबिंब आहे. कलाकार म्हणून आपण अभिव्यक्ती आणि हालचालींवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो आणि नृत्य त्याला अप्रतिमरीत्या अधिक सुंदर बनवते. मला अशा उद्योगाचा भाग असल्याबद्दल कृतज्ञता वाटते जिथे या अभिव्यक्तीच्या माध्यमाला इतके महत्त्व दिले जाते. प्रत्येक हालचाल एक शब्दही न उच्चारता कथा सांगू शकते हे खरोखरच अद्भुत आहे.”

‘लक्ष्मी निवास’ मालिकेत ‘राधिका’ची भूमिका करणारी अक्षिता मुद्गल म्हणाली, “नृत्य माझ्या आयुष्यात सकारात्मकता आणि संतुलन आणते. मी एखाद्या दृश्यासाठी सराव करत असो किंवा फक्त स्वतःसाठी नाचत असो, नृत्य माझा मूड लगेचच आनंदी बनवते. ‘वर्ल्ड डान्स डे’च्या निमित्ताने मी सर्वांना या अद्भुत कलाप्रकाराचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि त्याचा आनंद घेण्यासाठी शुभेच्छा देते. दैनंदिन जीवनातील गोंधळात स्वतःशी पुन्हा जोडले जाण्याचा हा एक सुंदर मार्ग आहे.”

‘सरु’ मालिकेत ‘सरु’ची भूमिका करणारी मोहक मटकर म्हणाली, “मी प्रशिक्षित शास्त्रीय नर्तक आहे आणि ही गोष्ट बहुतेक लोकांना माहिती आहे. लहानपणापासून मी शास्त्रीय नृत्य शिकत आले आहे आणि नृत्याने मला व्यक्ती आणि कलाकार म्हणून घडवले आहे. एक अभिनेत्री म्हणून मला वाटते की नृत्य माझ्या अभिनयाला एक वेगळा गहिरेपणा देते. ते मला बंधने तोडण्याची आणि लिहिलेल्या संवादांच्या पलीकडे जाऊन भावना व्यक्त करण्याची ताकद देते.”

# भारताने दर १-२ वर्षांनी भू-राजकीय व्यत्ययांसाठी सज्ज राहिले पाहिजे

**मुंबई (दै. संध्या) :**

ॲक्सिस बँकेचे मुख्य अर्थतज्ज्ञ नीलकंठ मिश्रा यांनी कोटक प्रायव्हेट बँकिंगच्या टेक अँड काउंटर टेक (टीएसीटी) या कार्यक्रमात बोलताना सांगितले की, भारताने दर एक ते दोन वर्षांनी येणाऱ्या भू-राजकीय व्यत्ययांसाठी स्वतःला सज्ज केले पाहिजे. तसेच, तणावाच्या सद्यस्थितीतील तात्पुरत्या विरामाचा उपयोग करून प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या संरचनात्मक सुधारणांना गती दिली पाहिजे. कोटक प्रायव्हेटद्वारे आयोजित या विशेष मंचावर बोलताना मिश्रा यांनी युक्तिवाद केला की, इराण आणि युनायटेड स्टेट्स यांच्यातील दोन आठवड्यांच्या युद्धविरामानंतर तणाव वाढण्याची भिती सध्यातरी ओसरली असली, तरी जागतिक धक्क्यांचे हे मोठे चक्र संपण्याची शक्यता कमी आहे. कोटक ॲसेट मॅनेजमेंटचे व्यवस्थापकीय संचालक निलेश शाह यांनी सूत्रसंचालन केलेल्या या सत्रात मिश्रा म्हणाले, "हा अमेरिका आणि चीनमधील एका मोठ्या युद्धाचा भाग आहे. जोपर्यंत ही समीकरणे सुटत नाहीत, तोपर्यंत आपण दर एक-दोन वर्षांनी अशा व्यत्ययांची अपेक्षा ठेवली पाहिजे." ते पुढे म्हणाले की, भारतासाठी यामधून मिळालेला धडा म्हणजे, स्थिरतेची वाट न पाहता विकासाची परिस्थिती अनुकूल असताना कडक निर्णय घेऊन अर्थव्यवस्थेत स्थिरता निर्माण करणे आवश्यक आहे. मिश्रा यांनी संघर्षाच्या दुय्यम परिणामांवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या मते, युद्धाचा फटका हेडलाईन्सपेक्षा पुरवठा यंत्रणांवर जास्त बसतो. "हे भारतासाठी वाईट आहे, पण जगासाठी अत्यंत भयानक आहे," असे ते म्हणाले. त्यांनी इशारा दिला की ऊर्जा, रसायने, खते, लॉजिस्टिक आणि विमान वाहतूक क्षेत्रातील व्यत्यय, रणांगणापासून दूर असलेल्या ठिकाणचे उत्पादनही शांतपणे ठप्प करू शकतात.

# कॅलिफोर्निया बदामांसोबत प्रत्येक सुपर क्षणाचा अनुभव घ्या

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सुपरफूड्ससह 'सुपर यू' सादर करत आहोत – एका रोमांचक मोहिमेद्वारे साकारलेला एक शक्तिशाली आणि नवीन ब्रँड प्लॅटफॉर्म. या मोहिमेत क्रिकेट आयकॉन नवज्योत सिंग सिद्धू यांचा समावेश आहे, ज्यांची अद्वितीय ऊर्जा चाहत्यांना यात सामील होण्यासाठी, उत्सव साजरा करण्यासाठी आणि मोठी बक्षिसे जिंकण्यासाठी आमंत्रित करते. या क्रिकेट हंगामात, कॅलिफोर्निया बदाम आपल्या 'सुपर यू विथ सुपरफूड्स' या नवीनतम मोहिमेद्वारे क्रिकेटचा उत्साह आणि बदामांची पौष्टिक शक्ती एकत्र आणत आहेत. व्हिटॅमिन ई, फायबर, मॅग्नेशियम आणि प्रथिने यांसारख्या २४ आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असलेले बदाम एक उत्तम सुपरफूड आहेत, जे मैदानावर आणि मैदानाबाहेर दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा आणि सर्वोत्तम कामगिरीसाठी मदत करतात.




या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक मोबाईल-फर्स्ट संवादात्मक स्पर्धा आहे, जी भारतातील सहभागींना थेट क्रिकेटचा उत्साह आणि बदामांच्या फायद्यांचा शोध एका आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने एकत्र करण्याची संधी देते. २७ एप्रिल ते २४ मे पर्यंत चालणाऱ्या या अनुभवात, जे सहभागी संपूर्ण क्रिकेट हंगामात सातत्यपूर्ण सहभाग आणि सक्रियता टिकवून ठेवतात, त्यांना पुरस्कृत केले जाते. सोपा वापर आणि सहज नेव्हिगेशनसह डिझाइन केलेल्या या प्लॅटफॉर्मवर, सहभागी थेट क्रिकेट सामन्यांदरम्यान त्यांच्या मोबाईल फोनवरून AlmondWin.com ला भेट देऊन, काही मूलभूत तपशील आणि OTP पडताळणीसह नोंदणी करू शकतात—ॲप डाउनलोड करण्याची आवश्यकता नाही. लॉग इन केल्यावर, वापरकर्ते कॅमेरा ॲक्सेस सक्षम करतात आणि एका ऑगमेंटेड रिॲलिटी अनुभवात प्रवेश करतात, जो त्यांच्या वास्तविक परिसराला आभासी घटकांसह जोडतो. अधिक माहितीसाठी, वापरकर्ते AlmondWin.com वर उपलब्ध असलेल्या सविस्तर FAQs चा संदर्भ घेऊ शकतात.

थेट क्रिकेट सामन्यांच्या तालावर, जेव्हा सहभागी सामन्याच्या महत्त्वाच्या क्षणी त्यांचे फोन हलवतात, तेव्हा त्यांच्याभोवती आभासी बदाम दिसू लागतात आणि हा अनुभव जिवंत होतो. मग तो षटकार असो, एक नेत्रदीपक झेल असो किंवा सामन्याचे चित्र बदलणारा निर्णायक क्षण असो, वापरकर्ते त्यांच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या बदामांवर टॅप करून सहभागी होऊ शकतात. चौकार, झेल किंवा महत्त्वपूर्ण कामगिरी यांसारख्या क्षणांमध्ये सोनेरी बदाम दिसतात, तर संपूर्ण सामन्यादरम्यान चांदीचे बदाम दिसतात. प्रत्येक टॅप केलेला बदाम सहभागीच्या स्कोअरमध्ये भर घालतो आणि त्वरित लहान बदामाचे फायदे अनलॉक करतो, ज्यामुळे प्रत्येक संवाद आकर्षक आणि माहितीपूर्ण बनतो. सहभागी अनेक थेट क्रिकेट सामन्यांमध्ये भाग घेऊन त्यांचे स्कोअर वाढवू शकतात आणि 'बदामाच्या फायद्यांचा' संग्रह पूर्ण करू शकतात. अधिक स्पर्धकांना जिंकण्याची संधी देण्यासाठी लीडरबोर्ड दर आठवड्याला रीसेट केला जातो; स्पर्धेदरम्यान एकूण गुण वाढत जातात, ज्यामुळे सक्रिय राहणाऱ्या स्पर्धकांना बक्षीस मिळते. प्रत्येक आठवड्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांना लोकप्रिय क्रिकेट सामन्यांची तिकिटे जिंकण्याची संधी असते, तर सर्वाधिक एकूण गुण मिळवणारे आणि आपले सर्व फायदे पूर्ण करणारे स्पर्धक 'महाबक्षीस' – अंतिम सामन्याच्या तिकिटांसाठी पात्र ठरतात. थेट सामन्याच्या क्षणांपलीकडे जाऊन, हा अनुभव स्पर्धकांना सोशल मीडियावर आपली प्रगती शेअर करण्यास प्रोत्साहित करतो, ज्यामुळे त्यांचा सहभाग एका सामाजिक चलनात रूपांतरित होतो. वेळेवर मिळणारे स्मरणपत्रे आणि व्हॉट्सॲप संदेश स्पर्धकांना स्पर्धेत जोडलेले राहण्यास आणि आपला प्रवास सुरू ठेवण्यास मदत करतात.

# संकट मोचन हनुमान – धैर्य आणि भक्तीची दिव्य गाथा, सोनी पल वर प्रीमियर

**मुंबई (दै. संध्या) :**

■ ४ मेपासून रात्री ९ वाजता, हा कार्यक्रम प्रेक्षकांना पुन्हा एकदा या पौराणिक कथेचा अनुभव देत, भक्तीची भावना नव्याने जागवणार आहे!




सोनी पल, भारतातील लोकप्रिय फ्री-टू-एअर मनोरंजन वाहिनी, विविध प्रकारच्या दर्जेदार कार्यक्रमांसाठी ओळखली जाते. ही वाहिनी अभिमानाने संकट मोचन हनुमान या पौराणिक मालिकेच्या प्रीमियरची घोषणा करत आहे. अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारी ही कालातीत मालिका आता सोनी पल वर नव्या रूपात सादर होत असून, प्रेक्षकांना भगवान हनुमानांच्या पराक्रमाची भव्य गाथा पुन्हा अनुभवण्याची संधी मिळणार आहे. या महाकथेच्या केंद्रस्थानी आहेत भगवान हनुमान भक्ती, शक्ती आणि धैर्य यांचे प्रतीक असलेले 'सुपरहिरो'. त्यांचा प्रवास शौर्य आणि अखंड निष्ठेने भरलेला आहे, जो सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या मनाला भिडतो आणि श्रद्धा, धर्मनिष्ठा व निःस्वार्थ सेवेसारख्या शाश्वत मूल्यांची आठवण करून देतो. भगवान हनुमानांचा हा प्रवास एक निर्भय रक्षक म्हणून उलगडतो, ज्यांची भगवान रामांप्रती निष्ठा अटळ आहे आणि वाईटावर विजय मिळवण्याचे त्यांचे धैर्य अतुलनीय आहे. भव्य दृश्यरचना आणि प्रभावी कथनशैलीमुळे ही मालिका केवळ मनोरंजन नाही, तर एक प्रेरणादायी आणि आत्म्याला स्पर्श करणारा अनुभव आहे. या मालिकेतील कलाकारांनी आपल्या भूमिकांना अत्यंत प्रभावीपणे साकारले आहे. गगन मलिक यांनी भगवान रामांच्या शांतता आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाला न्याय दिला आहे, देबलिना चॅटर्जी यांनी सीता मातांची करुणा आणि सामर्थ्य साकारले आहे, निर्भय वाधवा यांनी भगवान हनुमानांची दिव्य ऊर्जा प्रभावीपणे मांडली आहे, तर सौरव गुर्जर यांनी रावणाच्या भूमिकेत प्रभावी कामगिरी केली आहे. या सर्वांनी मिळून एक जादुई आणि परंपरेशी नातं जपणारा विश्व उभा केला आहे. भगवान हनुमानांना सर्वोच्च रक्षक आणि दिव्य सुपरहिरो म्हणून साजरे करण्याच्या मुख्य संकल्पनेवर आधारित संकट मोचन हनुमान ही मालिका आपल्या कालातीत संदेशाने आणि अविस्मरणीय अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहे. सोनी पल प्रेक्षकांना या दिव्य प्रवासात सहभागी होण्याचे आमंत्रण देत आहे कारण भगवान हनुमानांची गाथा पुन्हा एकदा टीव्हीवर परत येत आहे, अधिक प्रभावी, प्रेरणादायी आणि आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची!

# *अतुलनीय कौशल्य आणि अधिक व्यापक पोहोच : रेंटोकिल पीसीआय कडून पेकोपचे यशस्वी अधिग्रहण*

**पुणे (दै. संध्या) :**

भारतातील अग्रगण्य कीटक नियंत्रण आणि स्वच्छता सेवा प्रदाता, रेंटोकिल पीसीआय, पेकॉप पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा. लि. ("पेकॉप") च्या यशस्वी अधिग्रहणाची घोषणा करताना आनंदित आहे. या अधिग्रहणामुळे रेंटोकिल पीसीआयची, विशेषतः पश्चिम विभागातील ग्राहकांना सेवा देण्याची क्षमता अधिक मजबूत झाली आहे; तसेच कीटक व्यवस्थापन उद्योगात नवीन मानके स्थापित करण्याच्या तिच्या वचनबद्धतेलाही बळकटी मिळाली आहे. या अधिग्रहणामुळे, पेकॉपचा ग्राहक पोर्टफोलिओ, अनुभवी कर्मचारी वर्ग आणि कार्यात्मक मालमत्ता रेंटोकिल पीसीआय नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत. ही एकत्रीकरण प्रक्रिया नवोपक्रम, उत्कृष्ट सेवा आणि शाश्वत वाढ या समान दृष्टिकोनाने प्रेरित असलेल्या दोन संस्थांना एकत्र आणते. मुंबईमध्ये स्थापन झालेल्या पेकॉप ने अनेक दशकांमध्ये मजबूत प्रतिष्ठा निर्माण केली असून, व्यावसायिक सेवा, लक्झरी हॉस्पिटॅलिटी आणि प्रीमियम एंटरटेनमेंट क्षेत्रांसह विविध प्रतिष्ठित ग्राहकांना सेवा दिली आहे. रेंटोकिल पीसीआय सोबत एकत्र येत, पेकॉप आता जागतिक संसाधने, प्रगत R&D आणि विस्तृत डिजिटल पायाभूत सुविधांचा लाभ घेईल ज्यामुळे आपल्या ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये आणखी सुधारणा होईल.

पेकॉपला रेंटोकिल पीसीआय परिवारात स्वागत करताना, आम्ही अतुलनीय सेवा प्रदान करण्याच्या आमच्या बांधिलकीला अधिक बळकटी देत आहोत आणि भारतीय बाजारात सेवा क्षेत्रातील प्रगतीचे नेतृत्व करत आहोत. एकत्रितपणे, आम्ही आमच्या ग्राहकांना जागतिक दर्जाचे, तंत्रज्ञान-आधारित उपाय प्रदान करू.

**- डेव्हिड लुईस, व्यवस्थापकीय संचालक, रेंटोकिल पीसीआय.**

पेकॉपचा दीर्घकालीन स्थानिक अनुभव आणि रेंटोकिल पीसीआयचे जागतिक नेतृत्व यांच्या संयोगामुळे, आम्ही आमच्या निष्ठावंत ग्राहकांना अत्याधुनिक कौशल्य प्रदान करू शकतो. आम्ही आमच्या सेवांचा विस्तार करत असताना, आम्ही आमच्या ग्राहकांना अपेक्षित असलेली वैयक्तिक आणि नाविन्यपूर्ण सेवा सातत्याने देत राहू, ज्याला अधिक व्यापक आणि विशेष क्षमतांचा आधार असेल. ही भागीदारी आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा दर्शवते.

**- सिद्धार्थ बलवाणी, व्यवस्थापकीय संचालक, पेकॉप.**

# विवो इग्नाइटची चौथी आवृत्ती जाहीर

## देशातील युवकांना तंत्रज्ञानाद्वारे सशक्त करण्यावर भर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

Vivo India ने आपल्या प्रमुख शैक्षणिक उपक्रम 'विवो इग्नाइट : अ टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्ह'च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली असून, यंदा महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे इयत्ता ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवोपक्रम विकसित करण्याची आणि देशासमोरील महत्त्वाच्या आव्हानांवर उपाय शोधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू झाली असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी ३० जूनपर्यंत http://www.vivoignite.com या संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. विद्यार्थी वैयक्तिकरित्या किंवा तीन सदस्यांच्या गटात 'प्रोटोटाइप' श्रेणीत सहभागी होऊ शकतात. सामाजिक विकास, सॉफ्ट-टेक, कृषी, हवामान बदल आणि शाश्वत विकास उद्दिष्टांशी संबंधित विविध विषयांवर आधारित कल्पनांना प्राधान्य दिले जाणार आहे.

स्पर्धा एकूण सात टप्प्यांत पार पडणार असून, अंतिम फेरी ११ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे. अंतिम टप्प्यातील अव्वल १० स्पर्धकांना त्यांच्या कल्पना सादर करण्याची संधी मिळेल. विजेत्यांना एकूण ₹४० लाखांपर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि पारितोषिके दिली जाणार आहेत. यंदाच्या आवृत्तीमध्ये 'अचीव्हर ३०' हा नवा टप्पा समाविष्ट करण्यात आला आहे. टॉप २०० आणि टॉप १० दरम्यान निवडल्या जाणाऱ्या ३० स्पर्धकांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन दिले जाईल. तसेच, अव्वल १० स्पर्धकांच्या शिक्षकांना त्यांच्या योगदानाची दखल घेत प्रत्येकी ₹५०,००० पर्यंतचे नवोन्मेष अनुदान दिले जाणार आहे, ज्यामुळे शाळांमध्ये STEM शिक्षणाला चालना मिळेल.

या उपक्रमात महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांतील व सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांना विशेष गुण दिले जाणार असून, स्पर्धेत सर्व स्तरातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. यावेळी विवो इंडियाच्या मुख्य कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी गीताज चन्नना म्हणाल्या की, "दरवर्षी विवो इग्नाइटला अधिक व्यापक आणि परिणामकारक करण्याचा आमचा प्रयत्न असतो. देशातील युवकांमध्ये असलेली तांत्रिक क्षमता पाहून आम्हाला अभिमान वाटतो. या उपक्रमाद्वारे आम्ही विद्यार्थ्यांना नवोपक्रमासाठी सक्षम करत आहोत आणि तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांसाठी एक मजबूत व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत." या उपक्रमासाठी NCERT, IIT Madras येथील टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब, Science Olympiad Foundation आणि UN Global Compact Network India यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांची भागीदारी आहे. मागील आवृत्त्यांमध्ये या उपक्रमाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. विशेषतः तिसऱ्या आवृत्तीत ६६० जिल्ह्यांतील ९,००० पेक्षा अधिक शाळांमधून ३७,००० नोंदणी प्राप्त झाल्या होत्या.

# अब्जाधीश लोकसंख्या पुढील पाच वर्षांत ५१% ने वाढणार : नाइट फ्रँक

**पुणे (दै. संध्या) :**

आघाडीची स्वतंत्र जागतिक प्रॉपर्टी कन्सल्टन्सी कंपनी नाइट फ्रँक यांनी त्यांच्या प्रतिष्ठित द वेल्थ रिपोर्ट च्या २०व्या आवृत्तीचे प्रकाशन केले. या अहवालात भौगोलिक-राजकीय अनिश्चितता, वाढत्या व्याजदरांबाबतची चिंता आणि असमान आर्थिक कामगिरी असूनही जागतिक संपत्ती निर्मितीत झालेली मोठी गतीवाढ स्पष्ट करण्यात आली आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत जगातील अल्ट्रा - हाय - नेट-वर्थ व्यक्तींची (UHNWI, USD 30M+) संख्या १,६२,१९१ ने वाढली - म्हणजे दररोज सरासरी ८९ नवीन UHNWIs - आणि त्यामुळे जागतिक एकूण संख्या ७,१३,६२६ वर पोहोचली आहे. भारताची अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ (UHNW) व्यक्तींची कहाणी ही जलद विस्तारानंतर मोठ्या प्रमाणावर झालेल्या एकत्रीकरणाची आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत USD 30 MN+ लोकसंख्या ६३% ने वाढली असून, ती सुमारे १२,००० पेक्षा थोडी अधिक असलेल्या संख्येतून १९,८७७ पर्यंत पोहोचली आहे. ही वाढ तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्रे आणि भांडवली बाजारांमधील अभूतपूर्व संपत्ती निर्मितीचे प्रतिबिंब आहे. देश आता जगातील सहाव्या क्रमांकाची सर्वात मोठी UHNWI लोकसंख्या असलेला देश आहे. नाइट फ्रँकच्या वेल्थ साइजिंग मॉडेलनुसार, भारतातील UHNWI लोकसंख्या २०२६ च्या सुरुवातीच्या १९,८७७ वरून २०३१ पर्यंत २७% ने वाढून २५,२१७ होईल. मुंबई भारतातील UHNW म्हणजेच अल्ट्रा-श्रीमंत लोकसंख्येच्या ३५.४% वाट्यासह प्रमुख स्थानावर कायम आहे.


## जाहिर नोटीस

खालील परिशिष्टामध्ये नमूद मिळकत नंदा सुंदर हांडे, रा. ६०३, सी. टाईप, सी विंग, शिव आराधना, वाधवामेडोज, बी वार्ड ऑफिस समोर, गौरीपाडा, कल्याण पश्चिम, कल्याण ठाणे, ४२१३०१ यांचे खरेदी मालकीची वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना कायम खूषखरेदी देण्याची ठरविलेली आहे व सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा दिलेला आहे. तरी तमाम लोकांना या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास अशा व्यक्तिंनी या नोटिशीचे प्रसिद्धीपासून १४ दिवसांचे आत त्याबाबतचे कागदोपत्री पुराव्यासह आमची समक्ष गाठ घेऊन खात्री पटवून द्यावी, नपेक्षा सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचे व कोणी असल्यास त्यांनी आपले हक्क जाणीवपूर्वक सोडले असल्याचे समजून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कळावे, ही नोटीस.

: परिशिष्ट :

गाव मौजे वडगाव सहाणी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील जमीन मिळकत गट नं. ४०८ यासी एकूण क्षेत्र ०० हे. ३८ आर + पो.ख. ०० हे. ०७ आर ही संपूर्ण मिळकत यांसी चतुःसीमा - पूर्वेस : गट नं. ४०४, पश्चिमेस : गट नं. ३३४, दक्षिणेस : गट नं. ३३५ उत्तरेस गट नं. ४०७

Adv. Shrinath Sadashiv Kale
(B.S.L, DTL, LL.B.)
Office No.206, Dharmaraj Plaza, Pune-Nashik Highway, Narayangoan - 410504



## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , पुणे जिल्हा परिषद , पुणे.

## जाहीर खुली बी-1 निविदा सुचना क्रं. 1 / 2026-27

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे खालील कामांचे नावांसमोर नमुद केलेप्रमाणे फक्त पुणे जिल्हा परिषद पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गामधील नोंदणीकृत सर्वसाधारण कंत्राटदार / सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजूर सहकारी संस्था यांजकडून खाली नमुद कामांच्या सीलबंद पाकीटातील निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यांत येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,पुणे-411001 यांच्या कार्यालयातून दि. 29/04/2026 ते दि. 06/05/2026 वा. दुपारी 4.30 वा. पर्यंत देणेत येतील.तसेच सीलबंद भरलेल्या निविदा कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद पुणे यांचे कार्यालयात दि.07/05/2026 रोजी सायंकाळी 5.00 वा. पर्यंत स्विकारणेत येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी समक्ष समितीसमोर उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा र.रु. (Without GST) | निविदा फी (ना-परतावा) | बयाणा रक्कम रु. | काम पूर्ण कालावधी (महिने) | नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मौजे राजीवडी येथील नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती करुन घेणे ता.भोर जि.पुणे (टंचाई कार्यक्रम 25-26) | 844921/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 2. | मौजे खुलशी शिंदेवस्ती येथील नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती करुन घेणे ता.भोर जि.पुणे(टंचाई कार्यक्रम 25-26) | 836273/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 3. | नायगाव (मार्गवस्ती) स्त्रोत बळकटीकरण करणे ता.हवेली जि.पुणे(टंचाई कार्यक्रम 25-26) | 760656/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 4. | नायगाव (भिल्लनगर) स्त्रोत बळकटीकरण करणे ता.हवेली जि.पुणे(टंचाई कार्यक्रम 25-26) | 760656/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 5. | पेठ (वडाचीवाडी) स्त्रोत बळकटीकरण करणे ता.हवेली जि.पुणे(टंचाई कार्यक्रम 25-26) | 760656/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 6. | पेठ (पेठगाव) स्त्रोत बळकटीकरण करणे ता.हवेली जि.पुणे (टंचाई कार्यक्रम 25-26) | 760656/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |
| 7. | हिंगणगाव (गढवस्ती) स्त्रोत बळकटीकरण करणे ता. हवेली जि. पुणे(टंचाई कार्यक्रम 25-26) | 762614/- | 590 | 1% | 6 | सर्वसाधारण खुला वर्ग 1 ते 7 |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

1. म.शा.पा.पु.व स्वच्छता विभाग शा.नि.क्रं.जजीमि-2019/प्र.क्रं.81/पापु-07/2021,दि.15 फेब्रुवारी 2021 नुसार विविध शासकीय कंत्राटावर जीएसटी अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असलेने जीएसटीच्या कराच्या बोजाच्या विचार करुनच निविदा सादर करण्याबाबत स्पष्ट निर्देश कंत्राटदारास देण्यात येत आहे.
2. कोऱ्या निविदा संचासाठीचे अर्जासोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र,पॅन,जीएसटी इ. मुळप्रती दाखविलेनंतर त्यांना कोरे निविदा संचासाठीचे भरणा चलनावर सही शिक्के करुन देणेत येतील.
3. कोऱ्या बी-1 नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने फक्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा जिल्हा परिषद पुणे (विस्तारीत कक्ष) खाते क्रं. 29/26 येथे भरुन चलन दाखविलेस कोरे निविदा संच उपलब्ध करुन देणेत येतील.
4. सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.1 मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील. अ)पुणे जि.प.कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र.(आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची मुळप्रत. (इ)बयाणा/इसारा रक्कम निवीदा किंमतीच्या 1% एवढया रक्कमेचा पुणे येथे देय असलेला मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. पुणे, खाते क्र. 29/26 या नावाने काढलेला धनाकर्ष (D.D.) बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. (ई) पॅन कार्ड व जी.एस.टी.प्रमाणपत्र.
(टिप :- उपरोक्त सर्व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहेत. जर सादर केली नसतील तर संबधिताची निवीदा बाद केली जाईल).
5. सीलबंद लिफाफा क्रं. 2 मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा सही व आवश्यक असलेस शिक्का तसेच विहित ठिकाणी दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म विहित ठिकाणी दर लिहून स्वाक्षरी करुन सादर करावा.
6. लघुत्तम निविदा धारकांकडून एकूण 4%(बयाणा1%, निवीदा प्रक्रियावेळी 1%, प्रथम देयकातुन 2%) सुरक्षा अनामत घेतली जाईल.
7. अतिरिक्त सुरक्षा अनामत – 1)1% पर्यंत निरंक 2)1.01% ते 10% पर्यंत 1% 3)10% ते 15% पर्यंत जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा 4)15% पेक्षा जास्त कमी दर असेल तेवढया टक्केवारीच्या दुप्पट दराने) धनाकर्ष (Demand Draft) अथवा मुदतठेव पावती आर्थिक लिफाफा उघडलेपासून 8 दिवसाच्या आत कार्यालयामध्ये जमा करावा अथवा रोख चलनाने भरणा करावा.
8. प्रस्तुत कामाचा दोष दायित्व कालावधी काम पुर्ण झालेचे दिनांकापासून किमान १ वर्षापर्यंत राहील. ( म.शा.सार्व.बांध.वि.शासन निर्णय क्रं.संकिर्ण-2018/प्र.क्रं.151/इमारती-2/मंत्रालय,मुंबई-400032,दि.14 जानेवारी 2019. ) निविदेतील प्रस्तृत कोणत्याही कामासाठी भाववाढ अनुज्ञेय राहणार नाही..
9. म.जि.प. व पं.स. लेखासंहिता 1968 मधील प्रचलीत नियमांनुसार व विभागीय आयुक्त यांचेकडील परिपत्रक,दि.5.9.2018 नुसार कामास मुदतवाढ देणे, नुकसान भरपाई अथवा दंड आकारणी लावणे व प्रसंगी काम काढून घेणे याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद पुणे यांचे असतील.
10. निविदा प्रकीयेच्या कोणत्याही टप्प्यांवर अथवा निविदा मंजुरीनंतर कामाचे कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्रांच्या विधीग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरच्या निविदाधारकाची निविदा बाद करणेत येईल तसेच सदरची बाब कायदेशीर / फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.
11. शासन निर्णय दिनांक 5/10/2018 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी कार्यालयाकडे काढणे अनिवार्य आहे.
12. निविदेतील कामाचे लेखशिर्षानिहाय निधीचे उपलब्धतेनुसार पार पाडलेल्या कामाचे देयक अदा करणेत येईल. निधीचे उपलब्धतेच्या कारणामुळे झालेल्या विलंबाबाबत कोणत्याही प्रकारचा दावा ऐकला जाणार नाही. प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निविदा समिती/निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असुन निविदा भरण्याऱ्या कोणत्याही ठेकेदाराला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.
13. निविदा प्रपत्रातील व नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील.प्रशासकीय मान्यता आदेश व तांत्रिक मान्यता आदेश हा निविदेचा भाग असून त्यातील अटी व शर्ती कंत्राटदारांस व उपविभागास बंधनकारक राहतील.
14. वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकांस मान्य असल्याने त्याने निविदा सादर केली आहे असे गृहीत धरले जाईल.

**पुणे जिल्हा परिषद, पुणे (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग)**
**निविदा सुचना क्रं १/२०२५-२६**
**जा.क्रं.जिप/ग्रापापु/लेखा-१/१७२/२०२६.**
**पुणे, दि. २८/०४/२०२६.**

**सही /-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**

**सही /-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मावळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढणार; आढावा बैठक संपन्न

मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पदाधिकारी व कार्यकर्ता आढावा बैठक अत्यंत उत्साही वातावरणात आणि मोठ्या दिमाखात पार पडली. या बैठकीला आमदार सुनील शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, जनसंपर्क वाढवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना नव्या उर्जेसह दिशा देण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध महत्त्वाच्या आणि धोरणात्मक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. आमदार सुनील शेळके यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला. आगामी काळात गावागावांत दौरे करून जनतेशी अधिक घट्ट संपर्क साधण्याची भूमिका देखील त्यांनी स्पष्ट केली. सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणे आणि विकासाला गती देणे, या उद्देशाने बैठकीत एकजूट आणि सकारात्मक ऊर्जा पाहायला मिळाली. बैठकीला कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली होती, ज्यामुळे पक्षाच्या वाढत्या बळाची झलक दिसून आली. याप्रसंगी उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांचे आमदार सुनील शेळके यांनी मनःपूर्वक आभार मानले. "आपल्या सर्वांचा विश्वास आणि सहकार्य हेच पक्षाच्या बळकटीकरणाचे खरे बळ आहे. मावळच्या सर्वांगीण विकासासाठी आपण आणखी सक्षमपणे काम करूया," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### नृत्यतेजतर्फे आज आकुर्डीत नृत्यदिन

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी येथील नृत्यतेज अकादमी संचलित नृत्यकला मंदिराच्या वतीने दि. २९ रोजी जागतिक नृत्य दिनानिमित्त कलाकारांचा सत्कार करण्यता येणार आहे. हा कार्यक्रम दि. २९ रोजी संध्या. ५:३० वा आकुर्डी येथील गदीमा नाट्यगृहात होणार आहे. अशी माहिती नृत्यतेज अकॅडमीच्या संचालिका गुरू तेजश्री अडिगे यांनी दिली. यावेळी मिस इंडियाची नामांकन प्राप्त ईशा अगरवाल बॉलीवूड कोरिओग्राफर सचिन शिरसाठ (केटू) विश्व विक्रमी डॉ.दीपक हरके, अमित गावडे आदी उपस्थित राहणार आहेत. दि. १७ ते २९ या दरम्यान घेण्यात आलेल्या नृत्य शिबीराच्या सांगता प्रसंगी प्रख्यात गायिका जागतिक नृत्य दिनाच्या दिवशी आशाबाईंच्या विविध गाण्यावर आमचे 70 शिबिरार्थी नृत्याच्या विविध अदा सादर करणार आहे. यात सेमी क्लासिकल, लोकनृत्य, बेली डान्स, कंटेम्पररी, बॉलीवूड यांचा समावेश आसेल. नृत्यकला मंदिर आणि नृत्यतेज अकॅडमीतर्फे उत्कृष्ट बालकलाकार,उत्कृष्ट युवा कलाकार आणि उत्कृष्ट कोरिओग्राफर असे तीन पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.

### शासन निर्णयांच्या उल्लंघनाची उच्चस्तरीय चौकशी करा..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील प्रशासकीय कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित करत नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्तांकडे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांच्या कार्यकाळातील संशयास्पद निविदा प्रक्रिया, भ्रष्ट कारभार आणि शासन निर्णयांच्या उल्लंघनाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. निविदा प्रक्रिया, आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. विनोद नढे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, प्रदीप जांभळे यांनी विविध विभागांची जबाबदारी सांभाळताना घेतलेले काही निर्णय महापालिकेच्या आर्थिक हिताला बाधा पोहोचवणारे ठरले असून ठराविक कंत्राटदारांना लाभ मिळवून देण्यासाठी पदाचा गैरवापर झाल्याचा संशय आहे. तक्रारीतील प्रमुख मुद्द्यांनुसार, अनेक निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. निविदा अटींमध्ये फेरफार करून विशिष्ट ठेकेदारांना फायदा करून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत जादा दराच्या निविदांना मंजुरी देताना तांत्रिक निकषांकडे दुर्लक्ष झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, विविध विभागांतील कंत्राटी कर्मचारी भरती, साहित्य खरेदी आणि देखभाल कामांमध्ये कंत्राटदारांशी संगनमत झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही निकृष्ट दर्जाच्या किंवा तक्रारी असलेल्या कामांची देयके विनाचौकशी मंजूर करण्यासाठी दबाव टाकल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्याचे नढे यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर, प्रदीप जांभळे यांनी गेल्या दोन वर्षांत मंजूर केलेल्या सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी समितीद्वारे तपासणी करावी, तसेच मोठ्या निविदांचे फॉरेन्सिक ऑडिट स्वतंत्र संस्थेमार्फत करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी निष्पक्ष व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तात्पुरते जबाबदारीतून दूर करावे आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच, संशयास्पद प्रकल्पांची प्रलंबित देयके चौकशी पूर्ण होईपर्यंत रोखून धरण्याची मागणीही करण्यात आली आहे. महानगरपालिकेची प्रतिमा जपण्यासाठी आणि जनतेच्या पैशाचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक विनोद नढे यांनी केली आहे.



### निगडीत थरार..! नशेत तरुणाचा हायटेन्शन खांबावर तीन तास 'हाय-व्होल्टेज' ड्रामा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी परिसरात एक धक्कादायक आणि तितकीच थरारक घटना घडली. मानसिक अस्वस्थ आणि नशेत असलेल्या एका तरुणाने थेट हायटेन्शन वीज खांबावर चढून तब्बल तीन तास गोंधळ घातल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण नशेच्या अवस्थेत अचानक वीज खांबावर चढला आणि टोकावर जाऊन बसला. त्या वेळी वीजपुरवठा सुरू असल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली. या प्रकाराची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, बघ्यांची मोठी गर्दी जमल्याने परिसरात तणावाचे वातावरण होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने तत्काळ वीजपुरवठा खंडित केला. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी जीवाची पर्वा न करता खांबावर चढून त्या तरुणाला सुरक्षित खाली उतरवले. जवळपास अडीच ते तीन तास चाललेल्या या थरारानंतर अखेर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या प्रकारामुळे काही काळ परिसरात गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

# संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे स्मारक उभारू - अण्णा बनसोडे

**माता रमाई स्मारकाच्या भूमिपूजनाच्या पार्श्वभूमीवर पाहणी व आढावा**



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्प शहरातील आंबेडकरी जनतेच्या तब्बल २२ वर्षांच्या संघर्षलढ्याचे यश आहे. हा आनंदाचा क्षण असून

महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे रमाई स्मारक उभारू, असे प्रतिपादन राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे भूमिपूजन उद्या २८ एप्रिलला होत आहे, या पार्श्वभूमीवर बनसोडे यांनी या स्मारकस्थळाची पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सह शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता विजय जाधव यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बनसोडे म्हणाले, "त्यागमूर्ती माता रमाई स्मारक ही केवळ एक स्मारक नसून, आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा अध्याय आहे. या स्मारकाच्या माध्यमातून माता रमाई यांचा त्याग आणि त्यातून उभे राहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य याचे प्रभावी दर्शन नागरिकांना घडेल. हा रमाई सृष्टीचा भव्य आणि दर्जेदार प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासोबतच प्रकल्पात कोणतीही कमतरता राहू दिली जाणार नाही." माता रमाई स्मारक उभारणीमुळे शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक ओळखीमध्ये भर पडणार असून, हे स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास यावेळी बनसोडे यांनी व्यक्त केला.

सदर पाहणीवेळी संबंधित अधिकाऱ्यांनी स्मारकाच्या नियोजित आराखड्याची माहिती सादर केली. स्मारकाचे काम नियोजनबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना अण्णा बनसोडे यांनी दिल्या.

पिंपरी चौक येथे उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्पासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, सुमारे २४९८.९७ चौरस मीटर क्षेत्रावर हा प्रकल्प साकारला जाणार आहे. या अंतर्गत मजबूत आरसीसी स्ट्रक्चर, आकर्षक म्युरल्स, जीआरसी काम, पुतळ्यासाठी सुबक चौथरा व प्रतीक्षालय उभारण्यात येणार आहे.

परिसरात प्रवेश कमान, पादचारी मार्ग, लँडस्केप गार्डन, कारंजे व आधुनिक रोषणाईची व्यवस्था केली जाणार आहे. नागरिकांसाठी स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी रॅम्प व लिफ्ट तसेच बसण्याची सुविधा उपलब्ध असेल. यासोबतच क्युआर कोड व बहुभाषिक ऑडिओ प्रणालीसारख्या डिजिटल सुविधांमुळे नागरिकांना माता रमाई यांच्या जीवनकार्याची माहिती अधिक प्रभावीपणे अनुभवता येणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे पाठबळ आवश्यक

### स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे : विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीचे अभिषेक बारणे यांच्याकडून कौतुक

पिंपरी (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग' (प्रकल्प आधारित शिक्षण) ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले. काळेवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळेच्या वतीने 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य रितू पचारिया आणि विद्यार्थ्यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.




> महापालिका शाळांमधील ही बदलती आणि आधुनिक शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरणारी आहे. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला चालना देतात. त्यामुळे आगामी काळात हे 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन' केवळ एका शाळेपुरते मर्यादित न ठेवता, संपूर्ण शहर पातळीवर आयोजित करण्यासाठी प्रशासन स्तरावर नक्कीच प्रयत्नशील राहू."
>
> **– अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका**

याप्रसंगी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, भाजपा मंडल अध्यक्ष सनी बारणे, शाळेचे शिक्षक, आकांक्षा फाउंडेशनचे प्रतिनिधी, पालक आणि निमंत्रित सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थेरगाव येथील शाळेच्या सेकंडरी कॅम्पसमध्ये हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञान, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव या विषयांवर आधारित अत्यंत कल्पक आणि वैविध्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, ते प्रयोगांच्या माध्यमातून कसे मांडता येईल, याचे उत्तम सादरीकरण या प्रदर्शनातून केले. यावेळी सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्येक प्रकल्पाची बारकाईने पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या संकल्पना जाणून घेतल्या. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिषेक बारणे म्हणाले की, "पुस्तकी ज्ञानासोबतच प्रकल्पांच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खऱ्या अर्थाने वाढवते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून महापालिका शाळांच्या गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस उंचावणारा आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पांचे आणि शाळेच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

## इंद्रायणी एक्सप्रेसचा ३८वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



पिंपरी (दै. संध्या)

पुणे रेल्वे स्थानकात इंद्रायणी एक्सप्रेसचा ३८ वा वर्धापन दिन (दि.२७) मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यानिमित्त मासिक पासधारकांच्या डब्यात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अनेक प्रवासी व पासधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये श्री समीर मारू, श्री भाईजान मुलाणी, श्री महेश आंबर्ले, श्री रोहित साळवी, श्री मयंक शहा, श्री वासुदेव दाराडे, श्री कुणाल कांबळे, श्री मंगेश ओहाळ, श्री सुजित दळवी, श्री सुधीर झोपे, श्री किशोर नांगवेकर, श्री अजित बनसोडे, श्री मुन्ना तांबोळी, श्री मन्सूर तांबोळी, श्री चिराग पाठक, श्री सुप्रिया शेळार, श्री राजेंद्र ओहाळ, श्री आनंद कट्टी, श्री विशाल मोरे, श्री सुमित खैरनार, श्री महेश साळुंखे, अश्विनी जाधव, श्री महेश खरात आणि श्री नीलमाधव प्रधान यांचा समावेश होता. कार्यक्रमादरम्यान सर्व प्रवाशांच्या सुखकर व सुरक्षित प्रवासासाठी प्रार्थना करण्यात आली. तसेच उपस्थित सर्व पासधारकांच्या वतीने प्रवाशांना सुरक्षित आणि आनंददायी प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या अनोख्या उपक्रमामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाईचे आदेश

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. त्या बांधकामांवर तसेच, अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करा. ती कारवाई अधिक तीव आणि कडक करा, असे सक्त आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. अन्यथा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. आयुक्तांनी प्रमुख अधिकारी व सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण, बेकायदा जाहिरात होर्डिंग अनधिकृत नळजोड आदीबाबत आढावा बैठक घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांना ॲक्शन मोडमध्ये काम करण्यास बजावले. त्या बैठकीत आयुक्त बोलत होते.व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमाद्वारे झालेल्या या बैठकीत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, किशोर ननवरे, परशुराम वाघमोडे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे आदी उपस्थित होते. शहरातील अनेक भागांत अनधिकृत बांधकामे सुरू आहेत.

## अनधिकृत 'जीजस इज लॉर्ड' चर्चवर तातडीने निष्कासनाची कारवाई करा..!

पिंपरी (दै. संध्या)

- आमदार शंकर जगताप यांनी विधानसभा अधिवेशनात लक्षवेधी मांडूनही प्रशासनाचा 'कानाडोळा'
- विनोद नढे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

काळेवाडी परिसरातील अनधिकृत 'जीजस इज लॉर्ड' चर्चवर तातडीने निष्कासनाची कारवाई करण्याची मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. याठिकाणी धर्मांतराच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे कठोर पावले उचलण्याची मागणी करत चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी यासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडणी प्रशासनाकडून याकडे कानाडोळा होत असल्याचा आरोप नढे यांनी केला आहे. नगरसेवक विनोद नढे यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काळेवाडी परिसरामध्ये असलेल्या अनधिकृत 'जीजस इज लॉर्ड' चर्चच्या बांधकामाबाबत आणि तिथल्या संशयास्पद हालचालींबाबत स्थानिक नागरिकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.




याच विषयाचे गांभीर्य ओळखून चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. आमदारांनी विधानसभेत हा प्रश्न गांडल्यानंतरही महानगरपालिका प्रशासनाकडून सदर अनधिकृत इमारतीवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, ही खेदाची बाब आहे. प्रशासनाच्या या ढिलाईमुळे संबंधित घटकांचे मनोधैर्य वाढले असून, गेल्या दोन दिवसांपासून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर धर्मांतरणाचे प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. यामुळे परिसरातील सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पिंपरी चिंचवड शहरातील सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करा : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहराच्या विकासकामांमध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात तसेच महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून शहरातील विकास कामांचा वेग वाढविण्याचे आणि प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या



दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शहरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांची आढावा बैठक घेतली. यावेळी राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या. बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे स्वागत केले. यावेळी विधान परिषद सदस्य उमा खापरे, अमित गोरखे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शहर सुधार समितीचे सभापती संजय काटे, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, धर्मराज तंतरपाळे आदी उपस्थित होते. तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपसंचालक नगररचना किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, स्मार्ट सिटीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सह शहर अभियंता बापू गायकवाड, सुनिल भगवानी, प्रेरणा सिनकर, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीच्या सुरुवातीस आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणातून शहरात सुरु असलेले पाणी पुरवठा प्रकल्प, अमृत योजना २. ०, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प, शहरातील ड्रेनेज व पायाभूत सुविधा सुधार प्रकल्प, मेट्रो वाहतूक प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना, हुतात्मा क्रांतिवीर चापेकर वाडा, अग्निशमन केंद्र, नोकरदार महिला वसतिगृह, संतपीठ प्रकल्प, मनोरंजन प्रकल्प, नदी सुधार प्रकल्प, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता तसेच विविध नागरी प्रकल्पाची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना दिली.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी प्रत्येक प्रकल्पाची सध्यस्थिती, कामांचा प्रगतीदर, निधीचे वितरण, कामातील तांत्रिक अडचणी आणि त्यावरील उपाययोजना यांचा सखोल आढावा घेतला. शहरातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण प्रकल्प आणि मनोरंजन प्रकल्पांच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण विकास साधण्यावरही मार्गदर्शन करून सार्वजनिक ठिकाणे, उद्याने आणि नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा अधिक दर्जेदार करण्यासाठी कामांना गती देण्याच्या सूचना दिल्या. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांचा आढावा घेताना लाभार्थ्यांना वेळेत घरे उपलब्ध करून देण्याबाबत काटेकोर नियोजन करावे तसेच रस्ते विकास आणि वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा करून नागरिकांना सुरक्षित व सुकर प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिरूरमध्ये 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी आंदोलनाचा इशारा

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर शहरासाठी अत्यावश्यक ठरणाऱ्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या उभारणीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात भाजप महिला आघाडी आक्रमक झाली आहे. चुकीचा व अपूर्ण प्रस्ताव सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच दुरुस्त व परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा दि. ४ मे २०२६ पासून बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे तसेच तहसीलदार, पोलिस स्टेशन शिरूर यांना निवेदन देण्यात आले. दि. ११ सप्टेंबर २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही अद्यापपर्यंत योग्य प्रस्ताव सादर न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उलट वरिष्ठांकडे चुकीचा प्रस्ताव पाठवण्यात आल्यामुळे ही बाब अधिक गंभीर बनली आहे. दरम्यान, अलीकडेच शिरूर शहरात एका गरीब गर्भवती महिलेला वेळेत उपचार न मिळाल्यामुळे रस्त्यावरच प्रसूती करावी लागल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे शहरातील आरोग्य व्यवस्थेची दयनीय स्थिती पुन्हा एकदा समोर आली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शिरूर शहर व परिसरासह पुणे–नगर महामार्गावर वारंवार अपघात व आपत्कालीन वैद्यकीय परिस्थिती निर्माण होत असतात. अशा वेळी तातडीने उपचार मिळण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची नितांत गरज असल्याचेही निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे. यावेळी नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया बिरादार, उपाध्यक्षा सृष्टी करंजुले, निलू शर्मा कविता परदेशी भारती शहाणे मिरा परदेशी यांच्यासह मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

### पाण्याची पातळी पाहताना तोल गेला; विहिरीत पडून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

रांजणगाव सांडस (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील उरळगाव व परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, त्याच पार्श्वभूमीवर एका तरुण शेतकऱ्याचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. २७) घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.विशाल गेनभाऊ होलगुंडे (वय २६, रा. उरळगाव, ता. शिरूर, जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबतची फिर्याद त्यांचे चुलते भानुदास आप्पा होलगुंडे (वय ५५) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल होलगुंडे हे नेहमीप्रमाणे सकाळपासून शेतात काम करत होते. दरम्यान, विहिरीतील पाण्याची पातळी व वीजपंपाची स्थिती पाहण्यासाठी ते विहिरीजवळ गेले. यावेळी अचानक पाय घसरल्याने त्यांचा तोल जाऊन ते विहिरीत कोसळले. पोहता न आल्याने किंवा अपघाताच्या धक्क्यामुळे त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. घटनेच्या वेळी त्यांची आई अलका होलगुंडे यांनी विहिरीत पाहिले असता विशाल पाण्यात बुडत असल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ आरडाओरडा करून मदत मागितली. त्यांचा आवाज ऐकून जवळच शेतात काम करणारे भानुदास होलगुंडे व इतर शेतकरी घटनास्थळी धावून आले. स्थानिकांच्या मदतीने विशाल यांना बाहेर काढून तातडीने न्हावरे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणाचा पुढील तपास शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार दीपक पवार करीत आहेत. उरळगाव व पूर्व भागातील अनेक गावांमध्ये सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली असून, शेतकरी उरलेल्या पाण्यावर पिके जगविण्यासाठी धडपड करत आहेत. अशा परिस्थितीत विहिरीतील पाणी तपासण्यासाठी गेलेल्या तरुण शेतकऱ्याला जीव गमवावा लागल्याने दुष्काळाची झळ किती तीव्र आहे, याची जाणीव पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

### बारामतीत कोठडीत आरोपीची आत्महत्या; POCSO प्रकरणाने खळबळ

बारामती (दैनिक संध्या) : नात्यातील मुलीवर शारीरिक अत्याचार केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या रवींद्र आनंदराव गार्डी (वय ४८, रा. वडगाव निंबाळकर) या आरोपीने वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या कारागृहातच आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. नात्यातील एका अल्पवयीन मुलीवर गार्डी याने वारंवार शारीरिक अत्याचार केला होता. यातून पीडिता गर्भवती राहिल्यानंतर फलटणमधील एका खासगी हॉस्पिटलमध्ये तिला नेत त्याने तिचा गर्भपात करून घेतला होता. ही बाब पीडीतेच्या नातेवाईकांना समजतात त्यांनी त्याला चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले होते. पोलिसांनी या प्रकरणी शारीरिक अत्याचारसह पोकसो अन्वये गुन्हा दाखल केला होता. आरोपी पोलीस कोठडीत असताना मध्यरात्री त्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

# मारहाणीच्या घटनांनी कामगारांचा जीव टांगणीला

**चाकण भागातील स्थिती**

चाकण (दै. संध्या)




अवैध धंदेवाल्यांकडून स्थानिक नागरिकांसह परप्रांतीय कामगारांना जबर मारहाण करून लूटले जात असल्याच्या घटना घडत आहेत. अगदी हाकेच्या अंतरावर पोलीस चौकी आणि जवळच नव्याने झालेले पोलीस ठाणे असून देखील सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळत नाही. जर भर वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांना मारहाण केली जात असेल आणि त्यांची आर्थिक लूट केली जात असेल तर पोलीस याकडे दुर्लक्ष का करतात? याचे कारण गुलदस्त्यात आहे.

खेड तालुक्यातील वासुली फाटा ही महत्त्वपूर्ण बाजारपेठ आहे. एमआयडीसी टप्पा क्रमांक दोन व पाच आणि मावळ तालुक्यातील एमआयडीसीचा काही भाग आणि खेड तालुक्याचा पश्चिम भाग या सर्वांच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण आणि गजबजलेली बाजारपेठ आहे. या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातून नागरिक रोजीरोटीसाठी स्थायिक झालेले आहेत. परंतु या ठिकाणी असणाऱ्या चाकरमान्यांना गुंडगिरीचा मोठा सामना करावा लागत आहे. अवैध मटकेवाले, दारू विक्रीवाले तसेच अन्य बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांकडून परप्रांतीयांना धमकावून लुटले जात आहे. विरोध करणाऱ्यांना देखील बेदम मारहाण केली जात आहे. धक्कादायक म्हणजे स्थानिक नागरिक देखील यामध्ये भरडले जात आहेत.

चाकण भागात सुरू असणाऱ्या अवैध धंद्यात स्थानिक नागरिक कमी प्रमाणात, तर परजिल्ह्यांतून आणि पिंपरी, चिंचवड, पुणे, तळेगाव दाभाडे, देहूरोड यांसारख्या भागातून आलेले गुंड प्रवृत्तीचे लोक मोठ्या प्रमाणात दादागिरी करत आहेत. याठिकाणी अगदी भाजीपाला बाजारा लगत पोलीस चौकी देखील आहे. परंतु तरी देखील हे अवैध प्रकार पोलिसांना का दिसत नाही ?, याबाबत नागरिकांच्या मनात नाराजी आहे. बाजाराच्या दिवशी याठिकाणी लुटालूटीचे आणि मारहाण करण्याचे प्रमाण वाढले आहे. कामगारांचे पगार होण्याच्या दिवसांत देखील त्यांना वेगवेगळ्या मार्गाने लुटले जात आहे. भर वर्दळीच्या ठिकाणी जर अशा प्रकारे अवैध धंदे फोफावले असतील तर पोलीस याला पायबंद का घालत नाही ? असा देखील सवाल नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.

> "कामगारांना मारहाण व त्यांची लुटमार होत असेल तर असे प्रकार रोखण्यासाठी पोलीस यंत्रणा जास्तीत जास्त प्रयत्न करीन. चुकीच्या घटना घडवून आणणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल."
>
> **- दिगंबर सूर्यवंशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे इंगळे.**

**अवैध धंदे जोरात**

"चाकण पंचक्रोशीत कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहावी या दृष्टीने पोलीस ठाण्याचे विभाजन करून उत्तर आणि दक्षिण अशी दोन पोलीस ठाणे सुरू करण्यात आली. परंतु तरी देखील अवैध धंद्यांना कुठल्याही प्रकारचा आळा बसलेला नाही."

**पोलीस यंत्रणा काय कामाची?**

"नागरिकांना मारहाण होत असताना त्यांच्या तक्रारीकडे किंवा चौकाचौकात असणाऱ्या अवैध धंद्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. जर नागरिकांना संरक्षण देण्यात पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत असेल तर अशी पोलीस यंत्रणा काय कामाची ?, असा सवाल देखील नागरिक विचारत आहेत."

## खडकवासला धरणातून २.५२ टीएमसी पाणी विसर्ग

खडकवासला (दै. संध्या)

- बारामती, दौंड, इंदापूरसह हवेलीतील पिकांना संजीवनी; मेपर्यंत आवर्तन सुरू राहणार
- शेतकऱ्यांना दिलासा


बारामती, दौंड, इंदापूरसह हवेली तालुक्यातील शेतीसाठी खडकवासला धरणसाखळीतून उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले आहे. गेल्या 30 दिवसांत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आला. 29 मार्च ते 27 एप्रिल या कालावधीत 2.52 टीएमसी पाणी नवीन मुठा उजवा कालव्याद्वारे सोडण्यात आले. यामुळे पिकांना आधार मिळाला आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी वाढली आहे. खडकवासला कालव्याद्वारे सोडण्यात आलेल्या पाण्याचा फायदा इंदापूर, हवेली, दौंड आणि बारामती या तालुक्यांतील लाभक्षेत्रातील पिकांना होत आहे. प्रामुख्याने उन्हाळी पिके आणि फळबागांना हे पाणी संजीवनी ठरत आहे. मे महिन्यापर्यंत उन्हाळी आवर्तन सुरू राहणार असल्याचे खडकवासला पाटबंधारे विभागाच्या शाखा अभियंता गिरिजा कल्याणकर यांनी सांगितले.



यंदा धरणांमध्ये पाण्याची स्थिती गेल्या वर्षीपेक्षा चांगली आहे. सध्या चारही धरणांत मिळून 10.67 टीएमसी म्हणजे 36.61 टक्के पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी 9.42 टीएमसी म्हणजे 32.30 टक्के होता. जिल्ह्यातील शेतीसह पुणे शहरासाठी देखील पाणी सोडले जात आहे. वाढत्या तापमानामुळे होणारे बाष्पीभवन आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज, यामुळे सिंचन विभागासमोर नियोजनाचे आव्हान आहे. सध्या तरी धरणसाखळीत समाधानकारक पाणीसाठा आहे.

## बारामतीत एटीएममध्ये 'नो कॅश'; ग्रामीण अर्थकारण ठप्प

### शेतकरी, मजूर, व्यापाऱ्यांना मोठा फटका; तातडीने रोख रकमेच्या मागणी



बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये सध्या एटीएममध्ये रोख रकमेचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी एटीएम मशिन बंद अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी 'नो कॅश'चे फलक झळकत असल्याने नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडाली आहे. विशेषतः शेतकरी, मजूर आणि लहान व्यापारी वर्गाला या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे.

दररोजच्या व्यवहारांसाठी पैशांवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांना एटीएममधून पैसे मिळत नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. काही गावांमध्ये नागरिकांना त्यासाठी लगतच्या गावांत जावे लागत आहे. वेळ व इंधन खर्च करून तेथे गेल्यानंतरही तेथील एटीएममध्ये पैसे मिळतीलच याची खात्री उरलेली नाही. त्यामुळे इंधनाचा खर्च आणि वेळ दोन्ही वाया जात असून, संताप व्यक्त केला जात आहे. याशिवाय, शेतमाल विक्रीनंतर मिळालेल्या रकमेचा व्यवहार करणे, कामगारांचे वेतन देणे तसेच घरगुती खर्च भागवणे कठीण झाले आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर रोख रकमेची गरज अधिक असताना एटीएममध्ये ठणठणाट असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागात सध्या शेतकरी सोसायटीचे कर्ज नवे-जुने करण्याच्या मार्गात आहे. या पैशावरच त्याची वर्षभराची खते-बियाणे, औषधे तसेच अन्य देणी अवलंबून असतात. शेतकरी अजूनही मोठ्या प्रमाणात यूपीआयद्वारे व्यवहार करीत नाहीत.

सध्या खत विक्रेत्यांचा संप सुरू आहे. त्यामुळे त्यांच्याकडून शेतकऱ्यांकडे पैशाचा तगादा लावण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी बँकांकडे पैशाचा तगादा लावला आहे. आर्थिक व्यवहार फिरवा-फिरवीच्या या चक्रात सध्या ग्रामीण भाग अडकला आहे. याशिवाय रोख रक्कम काढण्यावरही बँकांकडून मर्यादा घालण्यात आल्या आहेत. परिणामी, ग्रामीण अर्थकारणाला मोठी खीळ बसली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित बँका आणि प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून एटीएममध्ये नियमित रोख उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा, ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**रोख रकमेचा तुटवडा**

विशेष म्हणजे, बँकांमध्येही रोख रकमेचा काही अंशी तुटवडा जाणवत आहे. नाव न छापण्याच्या अटीवर काही बँकांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्हालाच आवश्यक तेवढी रोख रक्कम मिळेनाशी झाली आहे.

## खोरमध्ये भीषण पाणीटंचाई; अंजीर बागांवर संकट

### तलाव कोरडे, शेतकऱ्यांची आवर्तनासाठी धावपळ; सिंचन योजनांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

खोर (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील खोर परिसरात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून, शेतकऱ्यांसमोर पाण्याचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरणारा डोंबेवाडी पाझर तलाव पूर्णपणे कोरडा पडला आहे. तसेच, पद्मावती तलाव आणि फरतडेवस्ती तलावातील पाणीसाठाही संपल्याने परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. यामुळे शेतीसह जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. खोर गाव अंजीर उत्पादनासाठी ओळखले जाते.



येथे मोठ्या प्रमाणात अंजीरबागा असून, येत्या 15 मेपासून छाटणीचा हंगाम सुरू होणार आहे. या काळात बागांना वेळेवर पाणी मिळणे अत्यावश्यक असते. मात्र, सध्याच्या पाणीटंचाईमुळे यंदाच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

सध्या परिसरातील ओढे, नाले, विहिरी आणि अन्य जलस्रोत आटले असून, शेततळ्यांतील उरलेला पाणीसाठाही झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेतून फरतडेवस्ती तलावात आवर्तन सोडण्यासाठी शेतकऱ्यांनी आर्थिक वर्गणी जमा करण्यास सुरुवात केली आहे.

तसेच, पुरंदर उपसा योजनेतून डोंबेवाडी पाझर तलावात आणि जनाई-शिरसाई योजनेतून पद्मावती व फरतडेवस्ती तलावात तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी करण्यात येत आहे. पाणी प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास अंजिरासह इतर पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत असून, प्रशासनाने त्वरित आवर्तन सुरू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. पुरंदर जलसिंचन उपसा योजनेतून डोंबेवाडी पाझर तलावात बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा करण्याची घोषणा अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. केवळ आश्वासनांवरच योजना अडकली असून, ती तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## पुण्यातील तरुणावर हल्ला, मुख्य सूत्रधार सागर कारिवडेकर अटकेत

सावंतवाडी (दै. संध्या)

ऑक्टोबर २०२५ मध्ये सावंतवाडी-सर्वोदयनगर येथे पुण्याच्या तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी फरार असलेला मुख्य सूत्रधार सागर सुबोध कारिवडेकर याला सावंतवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या. गेले सहा महिने पोलिसांना चकवा देणाऱ्या कारिवडेकरला रविवारी रात्री कारिवडे गावातून सापळा रचून अटक करण्यात आली. सोमवारी त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला २९ एप्रिलपर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. ६ ऑक्टोबर २०२५ च्या मध्यरात्री सर्वोदयनगर परिसरात पुणे येथील तरुण आणि स्थानिक तरुणांमध्ये जोरदार राडा झाला होता.

याप्रकरणी शौनक सपकाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून सागर कारिवडेकर आणि त्याच्या पाच साथीदारांविरुद्ध मारहाण व गाडी अंगावर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील तहा राजगुरू, तला राजगुरू आणि नितीन मेस्त्री या साथीदारांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती, मात्र मुख्य आरोपी सागर कारिवडेकर तेव्हापासून फरार होता.

## पार्थ पवारांची भूमिका ठरणार निर्णायक?

### राष्ट्रवादीत उमेदवारीसाठी अनेक नावांची चर्चा; तीन दिवसांत चित्र स्पष्ट होणार

बारामती (दै. संध्या)

विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले असल्याने सर्व पक्षांमध्ये जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. राज्याच्या राजकीय वर्तुळात सर्वाधिक चर्चा आहे ती अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेवर कोण जाणार याविषयी. त्याचे प्रमुख कारण म्हणजे अजित पवारांच्या निधनानंतर पार्थ पवार यांची पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बघायला मिळत आहे. या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या माध्यमातून पार्थ पवार यांना त्यांची स्वतःची विश्वासू टीम बनवण्याची संधी आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी ठरवताना पार्थ पवार यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. राज्यात पुढच्या तीन वर्षांनंतर लोकसभा आणि



विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी पक्षाचे संघटन मजबूत करून निवडणुकीत पक्षाला अपेक्षित यश मिळवून द्यायचं असेल, तर पार्थ पवार यांना त्यांची स्वतःची विश्वासू टीम लागेल. या टीममध्ये जुनेजाणते अनुभवी लोक जसे हवेत, तसेच नव्या दमाचे शिलेदार देखील लागतील. हे नव्या दमाचे शिलेदार निवडण्याची सुरुवात या विधान परिषदेच्या निवडणुकीपासून करण्यासाठी पार्थ पवारांना ही योग्य वेळ ठरू शकते. शिवाय दीर्घकालीन राजकारणासाठी स्वतःची विश्वासू टीम उपयुक्त ठरू शकेल. पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे, प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय माजी आमदार राजेंद्र जैन, माजी आमदार व पुणे शहराचे अध्यक्ष सुनील टिंगरे, प्रवक्ते आनंद परांजपे, उमेश पाटील आदींची नावे चर्चेत आहेत. यासोबतच माजी खासदार संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांचे देखील नाव चर्चेत आहे. यांपैकी कोणाला संधी मिळणार, की अन्य कोणाची वर्णी लागणार हे 30 एप्रिल रोजी स्पष्ट होईल. परंतु, चर्चेत असलेल्या नावांवर विचार करता सुनील तटकरे स्वतः प्रदेशाध्यक्ष असून, ते लोकसभेत खासदार आहेत. त्यांची मुलगी अदिती तटकरे राज्यात मंत्री आहेत.

# पुण्यात बंगल्याच्या आवारातच गांजाची लागवड

## लोहगाव पोलिसांची धडक कारवाई, सहा लाखांचा मुद्देमाल जप्त!

लोहगाव (दै. संध्या)

लोहगाव परिसरातील पठारे वस्ती येथे एका बंगल्याच्या आवारातच गांजाची लागवड करून विक्री करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. लोहगाव पोलिसांनी या कारवाईत गांजाची ४१ झाडे, वाहन आणि मोबाईल असा सहा लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोहगाव पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार आकाश मोरे आणि अमोल आदलिंग यांना पठारे वस्ती परिसरात गांजाची लागवड सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. ही माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीषा पाटील यांना देण्यात आल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सोमवारी (ता. २७) छापा टाकला.



छाप्यात हर्ष भरतकुमार पांचाल (वय ३०, रा. नमो पॅराडाईज, पठारे वस्ती, लोहगाव) याने भाडेतत्त्वावर घेतलेल्या बंगल्याच्या आवारात गांजाची लागवड केल्याचे उघड झाले. बंगल्याच्या गार्डनमध्ये लहान-मोठी अशी ४१ गांजाची झाडे आढळून आली. या झाडांचे एकूण वजन साडेचार किलो इतके होते. तसेच आरोपी वापरत असलेल्या वाहनातूनही गांजा जप्त करण्यात आला.

याशिवाय, घटनास्थळावरून नऊ मोबाईल हस्तगत करण्यात आले. या प्रकरणी हर्ष पांचाल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीषा पाटील यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक शुभांगी मगदुम, पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे, तसेच पोलिस हवालदार गणेश इथापे, गणेश सातपुते, पोलिस अंमलदार बाळासाहेब शिरसाठ, जोतीराम देवकाते, दादासाहेब बर्डे, आश्विन देठे, ज्ञानदेव आवारी, अल्पेश पोटकुले, प्रितम जंगम, सचिन जाधव, ज्ञानेश्वर आवारी, युवराज चौधरी, अशोक थोरात यांच्या पथकाने केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## 'गौ माता'ला 'राष्ट्र माता' घोषित करण्यासाठी उरण गौ भक्तांचे तहसीलदारांना निवेदन

उरण (दैनिक संध्या) : उरण येथील उरण गौ भक्त यांच्या वतीने आज उरणचे तहसीलदार रविंद्र सानप यांना 'गौ माता'ला 'राष्ट्र माता' घोषित करण्याबाबत अधिकृत निवेदन देण्यात करण्यात आले. भारतीय संस्कृतीत गाईचे असलेले धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व लक्षात घेता सदर निवेदन देण्यात आले.या उपक्रमाचा एक भाग म्हणून, देशभरातील ५०० हून अधिक तहसीलदारांना विविध ठिकाणी गौप्रेमी व गौभक्तांच्या वतीने अशाच प्रकारची निवेदने सादर करण्यात आली आहेत, ज्यातून या विषयाला राष्ट्रीय स्तरावर मिळत असलेला व्यापक पाठिंबा अधोरेखित होतो. यावेळी प्रतिनिधी मंडळाने उरण पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी देखील सविस्तर चर्चा केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांची भेट घेऊन त्यांना माहिती देण्यात आली.हा उपक्रम शांततेत, कायद्याचे पालन करून आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात येईल, याची माहिती प्रशासनाला देण्यात आले.सदर निवेदनात गाईला भारतीय परंपरेत "माता" म्हणून दिलेले स्थान, तिचे पोषणात्मक आणि कृषी अर्थव्यवस्थेतील योगदान यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच हा प्रस्ताव शासनाच्या उच्च स्तरावर पाठवून सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली आहे.या उपक्रमास स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी आपला पाठिंबा दर्शविला आहे. भविष्यातही जनजागृती आणि शांततापूर्ण मार्गाने हा अभियान पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.यावेळी उरण मधील गौ भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाजवादी पक्षाचा महापालिकेच्या अतिक्रमण कारवाईविरोधात इशारा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेकडून शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण कारवाईत गरीब व सर्वसामान्यांवर कठोर कारवाई केली जात असताना उच्चभ्रू आणि धनदांडग्या घटकांच्या अतिक्रमणांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप समाजवादी पक्षाच्या वतीने आज पत्रकार परिषदेत करण्यात आला. यावेळी पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर यांच्यासह अनिस अहमद, साधना शिंदे, दत्ता पाकिरे, विनायक लांबे, अशोक गायकवाड, प्रकाश डोंबाळे, अनिरुद्ध सुर्यवंशी, शहाजहान झारी, जावेद शेख, अझिम शेख, इब्राहिम यवतमाळवाले,भारत मालुसरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. समाजवादी पक्षाने आयुक्त मा. नवल किशोर राम यांना निवेदन देत अतिक्रमण कारवाईतील भेदभावाचा जाब विचारला असून, गरीबांवर अमानवीय पद्धतीने कारवाई होत असल्याचा निषेध व्यक्त केला. यावेळी अतिक्रमण विरोधी पथकाच्या कारवाईतील काही व्हिडिओंचा उल्लेख करत गरीब आणि वृद्ध महिलांवर झालेल्या गैरवर्तनाचा निषेध करण्यात आला. पत्रकार परिषदेत पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर यांनी सांगण्यात आले की, पुण्यातील विंडसर अव्हेन्यु कॉन्डोमिनियम वानवडी या उच्चभ्रू सोसायटीने पुणे महानगरपालिकेचा तब्बल ३५ ते ४० कोटी रुपयांचा भूखंड गेल्या २० वर्षांपासून बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतला असता याबाबत १३ जानेवारी २०२५, ७ एप्रिल २०२५, ८ मे २०२५ आणि १३ जून २०२५ रोजी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. महापालिकेच्या संबंधित विभागांनी नोटिसा देऊनही आणि मालमत्ता विभागाने अतिक्रमण हटवण्याच्या स्पष्ट सूचना करूनही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. "गरीबांसाठी एक न्याय आणि श्रीमंतांसाठी दुसरा न्याय आम्ही सहन करणार नाही. अतिक्रमण हटवायचेच असेल तर सर्वांवर समान निकष लावा," अशी भूमिका समाजवादी पक्षाने मांडली. या संदर्भात तातडीने कारवाई न झाल्यास गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी पुणे महानगरपालिकेसमोर समाजवादी पक्षाच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला. तसेच समाजवादी पक्षाने प्रशासनाला पक्षपाती कारवाई थांबवून समान न्यायाच्या तत्वावर त्वरित निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.



# उत्स्फूर्तता आणि जगण्यातला सहजभाव म्हणजे आशाताई! - सुधीर गाडगीळ

**पिंपरी (दै. संध्या)**



'उत्स्फूर्तता आणि जगण्यातला सहजभाव म्हणजे आशाताई भोसले होत्या. त्यांच्या जाण्याने मी कमालीचा अस्वस्थ झालो आहे!' असे भावपूर्ण उद्गार सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी खुशबू बंगला, पु. ना. गाडगीळ समोर, चिंचवडगाव येथे रविवार, दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी काढले. विख्यात गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजलीनिमित्त कलारंजन प्रतिष्ठान, सांगवी आयोजित 'भावांजली आशाताईंना...' या शब्दसुरांच्या मैफलीत कलारंजनचे अध्यक्ष श्रीकांत चौगुले यांनी सुधीर गाडगीळ, मराठी संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका डॉ. वंदना घांगुर्डे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ संगीतकार मधू जोशी यांच्याशी मुक्त संवाद साधला.

सुधीर गाडगीळ म्हणाले की, 'आशाताई विविध गुणसंपन्न होत्या. रमणबागेतील एका प्रकट मुलाखतीदरम्यान अचानक मुसळधार पावसाला सुरुवात झाली; परंतु सलग दोन तास स्वत: चिंब भिजत त्यांनी समोरील श्रोतृवर्गाला आपल्या वैविध्यपूर्ण गीतांनी भिजवून टाकले होते. सुमारे चार दशकांच्या कालावधीत तब्बल अठ्ठावीस वेळा त्यांची प्रकट मुलाखत घेण्याची संधी मला मिळाली; पण प्रत्येक मुलाखत वेगळेपणामुळे चिरस्मरणीय ठरली. आशा भोसले यांच्या अप्रकाशित खळबळजनक आत्मचरित्राचा पहिला वाचक होण्याची संधी मला मिळाली; परंतु अद्यापही ते प्रकाशित का झाले नाही, याचे कारण गुलदस्त्यात आहे!' डॉ. वंदना घांगुर्डे यांनी, 'आशाताई यांना वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून दैवी सुरांचा वारसा प्राप्त झाला होता. रियाज अन् उत्स्फूर्तता यांचा सुरेख समन्वय साधल्याने त्याला परातत्त्वाचा स्पर्श झाला!' असे मत व्यक्त केले. भाऊसाहेब भोईर यांनी २००२ मध्ये आशा भोसले पुरस्काराच्या निमित्ताने लता मंगेशकर आणि आशा भोसले यांना पिंपरी - चिंचवडमध्ये एकाच व्यासपीठावर एकत्र आणून संपन्न झालेल्या ऐतिहासिक मैफलीची आठवण जागवीत 'लतादीदी भारतीय संगीताचा श्वास तर आशाताई म्हणजे उच्छ्वास होत्या!' अशी भावना व्यक्त केली. मधू जोशी यांनी सांगली येथील मंगेशकर भावंडांच्या बालपणीच्या आठवणींचे किस्से कथन केले. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मुक्त संवादात गायिका अर्चना सुतार यांनी सादर केलेल्या 'जय शारदे वागेश्वरी...' , 'का रे दुरावा?' , 'केव्हा तरी पहाटे...' या आशा भोसले यांच्या मूळ आवाजातील गीतांचे प्रभावी सादरीकरण करीत श्रोत्यांकडून दाद मिळविली.

अभय पोकर्णा, राम गायकवाड यांनी संयोजनात सहकार्य केले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. आर. बी. पाटील यांनी आभार मानले.

## केविनकेयरच्या नाईल ने नाईल+ सह केस निगाराच्या नव्या युगाची सुरुवात केली

**मुंबई (दै. संध्या)**

एफएमसीजी क्षेत्रातील आघाडीची कंपनी केविनकेअर प्रायव्हेट लिमिटेड च्या प्रीमियम नैसर्गिक व सुरक्षित केस निगारा उत्पादनांची मालिका असलेल्या नाईल ने नाईल++ लाँच केले आहे— एक नाविन्यपूर्ण, कामगिरी-केंद्रित मालिका ज्यामध्ये दोन क्रांतिकारी प्रकार आहेत: सीरम शॅम्पू आणि चिया सीड जेल शॅम्पू. हे लाँच ब्रँडचा संकरित केस निगारा प्रकारांमध्ये प्रवेश दर्शवते, जे एकाच उत्पादनात अनेक फायदे एकत्र करण्यासाठी डिझाइन केले आहे. या लाँचसह, नाईल आपला उत्पादन संच बळकट करत आहे.




जेथे पहिले हे कामगिरी दर्शवते आणि दुसरे ; हे अनोख्या पोत, ताजेतवाने सुगंध आणि उत्तम केस धुण्याच्या अनुभवाद्वारे उन्नत संवेदना अनुभव दर्शवते. पुढच्या पिढीच्या ग्राहकांसाठी डिझाइन केलेले जे परिणामांशी तडजोड न करता सोपी उच्च-कार्यक्षम केस निगारा हवी आहे, या मालिकेत लक्ष्यित संकरित उपाय आहेत. मॅकॅडेमिया नट तेल सीरम युक्त सीरम शॅम्पू लाँचबद्दल बोलताना, श्री. राजत नंदा, व्यवसाय प्रमुख – वैयक्तिक निगारा, कॅव्हिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड म्हणाले आज ग्राहक केस निगाराकडे कसे पाहतात यात आम्हाला एक स्पष्ट बदल दिसतो. त्यांना कमी पायऱ्या हव्या आहेत, पण चांगले परिणाम हवे आहेत. नाईल++ च्या दोन नव्या उत्पादनांसह, आम्ही अनेक फायदे एकत्र करत आहोत. सोप्या दिनचर्यांसाठी आणि उन्नत संवेदना अनुभवासाठी. हे लाँच नाईल++ च्या मोठ्या प्रवासाची सुरुवात आहे, भविष्यात आणखी नाविन्यपूर्ण उत्पादने आणण्याच्या योजनांसह. व्यावसायिक दृष्टीकोनातून, हे केस निगारा क्षेत्रातील उच्च-वाढीच्या, नाविन्य-केंद्रित विभागांमध्ही नाईलची उपस्थिती बळकट करण्याचे आणि पुढच्या पिढीच्या प्रकारांसह आमचा उत्पादन संच विस्तारण्याचे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

# पर्यटननगरी लोणावळ्यातील पार्किंगची समस्या सुटणार; खासदार बारणे यांची माहिती

**मावळ (दै. संध्या)**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केली. त्यावर तत्काळ जागेची पाहणी करुन वाहनतळ विकसित करण्याची ग्वाही रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेची चालू, प्रलंबित, प्रस्तावित कामांसदर्भात खासदार बारणे यांनी रेल्वेचे महाप्रबंधक हिरेशजी मीना यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. आमदार सुनील शेळके, निरज यादव, प्रबंध मानस पुरे, नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, संजय भोईर, कर्जत प्रवासी संघटनेचे अध्यक्ष पंकज ओसवाल, लोणावळा नगरपरिषदचे नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल. रेल्वे अधिकाऱ्यांसाठी असलेल्या निवासस्थान परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करावी. लोणावळ्यात रेल्वे अंतर्गत असलेल्या २५ एकर जागेत रेल्वे म्युझिम करावे. ओव्हर ब्रीजच्या कामाला गती द्यावी. कुमार रिसॉर्टपासून रस्ता बाजारपेठेत जातो. या पुलाचे रुंदीकरण करावे. मैदान विकसित करावे.

भुशी धरण परिसरात हंगामी स्वरूपाचा पर्यटन व्यवसाय करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी लावलेल्या दुकानांवर रेल्वे प्रशासनाकडूनअतिक्रमण कारवाई करण्यात आली. या परिसरामध्ये व्यवसाय करणारे स्थानिक नागरिक मागील ४० वर्षांपासून या ठिकाणी चहा, वडापाव, भजी विक्रीचा व्यवसाय करतात. केवळ व्यवसायच नाही तर भुशी धरणावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी देखील हेच व्यावसायिक घेत असतात. स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी चर्चेतून मार्ग काढावा. रेल्वेची सुरक्षा, स्थानिकांचे हित पाहून समन्वयातून चांगला प्रस्ताव आणावा. स्थानिकांना भाडेतत्वार जागा उपलब्ध करुन देण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली. यावर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

पनवेल, नेरळ, कर्जत रेल्वे स्टेशनचा अमृत भारत योजनेअंतर्गत विकास करावा.पनवेल ते कर्जत रेल्वे मार्गाचे काम पूर्ण होत आले आहे. येथील जुन्या स्टेशनपासून नवीन कॉरिडॉरला जोडणारा मार्ग तयार करावा. प्रवाशांना सुविधा द्याव्यात. मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्टेशनवर एक्सप्रेस गाड्यांचे थांबे होते. कोरोना काळात हे थांबे बंद केले. त्यानंतर पुन्हा सुरु केले नाहीत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकांवर कोयना एक्सप्रेस, हैद्राबाद, चेन्नई, गढक, सिद्धेश्वर, कोल्हापूर-अहमदाबाद, बंगळुरु-जोधपूर या एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना थांबे द्यावेत. पुणे-लोणावळा मार्गावरील दुपारी दीड वाजताची लोकल पुन्हा सुरु करावी, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

मावळातील डोंगरगाव येथील ३४ नंबरचे रेल्वे गेट केवळ १२ तास सुरु असते. हे गेट २४ तास सुरु ठेवावे. नाणे येथील गेट नंबर ४३ सुरु ठेवावे. कामशेत येथे आंदर मावळकडे जाणाऱ्या रस्त्यावर ओव्हर ब्रीज उभारण्यात यावा. पनवेल तालुक्यातील सोमाटणेतील गेट नंबर ७५ येथे अंडर पास तयार करण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

## किडनी विक्री प्रकरणात रविंद्रपाल सिंग यांना जामीन नाहीच, हायकोर्टाचा निर्णय

**नागपूर (दै. संध्या)**

चंद्रपूर जिल्ह्यातील बहुचर्चित किडनी विक्री प्रकरणामध्ये आरोपी असलेले दिल्ली येथील डॉ. रविंद्रपाल सिंग जसपाल सिंग यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने सोमवारी गुणवत्ताहीन ठरवून फेटाळून लावला. न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी हा निर्णय दिला.

हे प्रकरण अतिशय गंभीर असून सर्व बाजूने सखोल तपास होणे गरजेचे आहे. रेकॉर्डवर ठोस प्राथमिक पुरावेदेखील आहेत. त्यामुळे सिंग यांना अटकपूर्व जामीन दिला जाऊ शकत नाही, असे निर्णयात स्पष्ट करण्यात आले. मुख्य सरकारी वकील वरिष्ठ अॅड. देवेंद्र चव्हाण यांनी प्रकरणातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांकडे न्यायालयाचे लक्ष वेधून सिंग यांना अटक करणे आवश्यक असल्याचा दावा अंतिम सुनावणीत केला होता. या प्रकरणात ब्रह्मपुरी पोलिसांनी सिंग यांच्यासह मुख्य सुत्रधार डॉ. क्रिष्णा, एजंट हिमांशू, त्रिची येथील स्टार किम्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजरत्नम गोंविदसामी व सहा सावकारांविरोधात एफआयआर नोंदवला आहे. यापूर्वी सिंग यांना सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला होता. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने सुरुवातीला त्यांना तात्पुरता अटकपूर्व जामीन दिला होता. परंतु, अंतिम सुनावणीनंतर हा निर्णय देण्यात आला.

रोशन कुडे, असे किडनी विकणाऱ्या व्यक्तीचे नाव असून ते नागभीड तालुक्यातील मिथूर येथील रहिवासी आहेत. व्यवसायाने शेतकरी असलेल्या कुडे यांनी सावकार प्रदीप बावनकुळेकडून कर्ज घेतले होते.

त्या कर्जाकरिता कुडे यांचा मानसिक छळ केला जात होता. त्यामुळे त्यांनी कम्बोडिया येथे किडनी विकली. या रॅकेटमध्ये सिंगसह इतर आरोपी सामील आहेत, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

## TCS मधील धर्मांतर प्रकरणात धक्कादायक खुलासा

**मुंबई (दै. संध्या)**

टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रयत्न प्रकरणातील फरार आरोपी निदा खान हिच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सोमवारी (दि.२७) नाशिकरोड न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली. न्या. के. जी. जोशी यांनी दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर अटकपूर्व व अंतरिम जामीन अर्जावरील निकालासाठी २ मे ही तारीख निश्चित केली असून, तोपर्यंत निदा खानच्या अटकेवर टांगती तलवार आहे.

दरम्यान, या गंभीर गुन्ह्यात मलेशियाशी संबंधित काही आर्थिक संबंध असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असल्याचा अत्यंत धक्कादायक खुलासा सरकारी वकील अजय मिसर यांनी केला, तसेच जे जबाव या प्रकरणात प्राप्त झाले आहेत, त्यात धर्मांतराचा प्रयत्न करण्यासाठी मालेगाव कनेक्शनही आहे, ते कनेक्शन मिसर यांनी न्यायालयासमोर नमूद केले.

पीडित महिलेच्या धर्मांतराचा प्रयत्न करून तिचे नाव बदलण्यात आले होते. तिला मलेशियामध्ये 'इम्रान' नावाच्या व्यक्तीकडे नोकरीसाठी पाठविण्याचा मोठा कट आरोपींनी रचला होता. पीडितेचे धर्मांतर करण्याच्या उद्देशाने आरोपी निदा खान हिने तिच्या मोबाइलमध्ये तिच्या धर्माशी संबंधित ॲप्लिकेशन डाउनलोड करून दिले, तसेच यूट्यूब, इन्स्टाग्राम लिंक व रील्सद्वारे धार्मिक शिक्षण पाठविले, असे ॲड. अजय मिसर यांनी न्यायालयाला सांगितले.

**हिजाब परिधान करणे, रोजा पाळणे**

पीडित मुलीला हिजाब परिधान करणे, रोजा पाळणे यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले, असेही तपासातून समोर आले असल्याचे त्यांनी नमूद केले. पीडितांनी दिलेल्या जबाबांमध्ये मालेगाव येथील काही व्यक्ती व दुव्यांचा उल्लेख असून, त्याची माहिती न्यायालयासमोर सादर करण्यात आली. या सर्व बाबींचा सखोल तपास अद्याप बाकी असून, आरोपीकडील मोबाइल जप्त करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आरोपीला अटकपूर्व जामीन देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.

# नोबल हॉस्पिटलने अत्यंत दुर्मिळ रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची यशस्वी कामगिरी करत इतिहास रचला

**भारतातील दुसऱ्या अशा शस्त्रक्रियेची नोंद करत, पुण्यात रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया करणारे पहिले रुग्णालय ठरले**

**पुणे (दै. संध्या)**

हडपसर येथील नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरने रोबोटचा वापर करून कीहोल पोर्ट्सद्वारे संपूर्णपणे करण्यात येणारी 'रोबोटिक लेफ्ट एट्रियल मीक्झोमा एक्सिजन' ही गुंतागुंतीची हृदयातील गाठ काढण्याची शस्त्रक्रिया नुकतीच यशस्वीरित्या केली.हृदयविकार उपचार क्षेत्रात हे एक महत्वाचे यश आहे.

ही शस्त्रक्रिया एका ५५ वर्षीय महिलेवर करण्यात आली. नियमित तपासण्यांमध्ये त्यांच्या छातीच्या डाव्या कप्प्यात ट्युमर (गाठ) असल्याचे निदान झाले होते. अशा प्रकारच्या गाठींना लेफ्ट एट्रियल मीक्झोमा असे म्हणतात. ही सामान्यपणे आढळणारी आणि कर्करोगग्रस्त नसलेली गाठ (बेनाइन ट्युमर) असली तरी यामुळे रुग्णांना स्ट्रोक येणे किंवा धाप लागणे यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.अशा स्थितीत शस्त्रक्रियेद्वारे गाठ काढून टाकणे हा एकमेव उपचार पर्याय असतो.

पारंपरिकपणे, या शस्त्रक्रियेसाठी 'मीडियन स्टर्नोटॉमी' ची आवश्यकता असते, ज्यामध्ये छाती उघडण्यासाठी आणि हृदयापर्यंत पोहोचण्यासाठी छातीचे हाड कापावे लागते.नोबल हॉस्पिटलमध्ये प्रथमच, हीच प्रक्रिया रोबोटच्या साहाय्याने, केवळ लहान पोर्ट इन्सिजनद्वारे करण्यात आली. या प्रक्रियेत कोणताही मोठा छेद नाही, किंवा छातीचे हाड कापण्याची गरज भासली नाही. या प्रक्रियेत हार्ट लंग मशीनचा वापर करत हृदय थांबवण्यात आले. थ्रीडी कॅमेराच्या सहाय्याने हृदयाच्या डाव्या कप्प्यात जाऊन अचूकपणे ही गाठ काढण्यात आली .

रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेचे रुग्णांना थेट अनेक फायदे मिळतात. त्यामध्ये कमीत कमी रक्तस्त्राव,शस्त्रक्रियेनंतर कमी वेदना, जलद पुनर्प्राप्ती आणि रुग्णालयात कमी कालावधी, छातीवर मोठ्या व्रणाऐवजी लहान व्रण अशा अनेक फायद्यांचा समावेश आहे. करण्यात आलेले छेद हे रोबोटच्या साह्याने टाके घालून बंद करण्यात आले.

हे हृदय शस्त्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पाऊल असून हृदय शल्यचिकित्सक डॉ. धैर्यशील कणसे यांच्या नेतृत्वाखाली, वरिष्ठ कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. आशिष पोखरकर यांच्या सहकार्याने पार पडली. शस्त्रक्रिया करणाऱ्या टीममध्ये डॉ. अनिरुद्ध ढेकणे आणि डॉ. एन. जाधव यांचा समावेश होता. भूल देण्याचे काम डॉ. सम्राट मदनाईक आणि डॉ. परमिता दीक्षित यांनी केले.

ही प्रक्रिया भारतीय हृदयरोग शल्यचिकित्सकाने विकसित केलेल्या 'एसएसआय मंत्रा' या रोबोटिक प्रणालीचा वापर करून करण्यात आली. हे प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानातील भारताची वाढती क्षमता दर्शवते.

या यशामुळे अनेक हृदय रुग्णांसाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. तज्ञांच्या मते, रोबोटिक तंत्रज्ञान लवकरच ट्यूमर काढण्यापलीकडे जाऊन रोबोटिक एएसडी क्लोजर, रोबोटिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि रोबोटिक-असिस्टेड बायपास शस्त्रक्रियांपर्यंत विस्तारणार आहे. शस्त्रक्रियेतील कौशल्य जसजसे वाढेल, तसतशी ही पद्धत संपूर्ण भारतात आणि जागतिक स्तरावर वापरली जाऊ शकते, ज्यामुळे प्रगत हृदयसेवा कमी त्रासदायक आणि अधिक सुलभ होईल.

या यशाबद्दल बोलताना डॉ. कणसे म्हणाले की, हृदय शस्त्रक्रियेतील एका नव्या युगाची ही केवळ सुरुवात आहे, जिथे रुग्णांना कमीत कमी त्रासासह जागतिक दर्जाचे परिणाम मिळतील.

नोबल हॉस्पिटल्स ॲन्ड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे म्हणाले की, हा महत्वाचा टप्पा आपल्या शहरातील हृदयविकार उपचार क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवतो. रोबोटिकच्या साहाय्याने केलेली शस्त्रक्रिया अधिक अचूकता देतेच, पण त्याचबरोबर रुग्णांना जलद बरे होणे, कमी वेदना आणि उत्तम वैद्यकीय परिणाम शक्य करते. आरोग्यसेवेचे नवे मापदंड स्थापित करण्यासाठी आम्ही अत्याधुनिक वैद्यकीय नवकल्पना आणि कुशल मनुष्यबळामध्ये सातत्याने गुंतवणूक करत राहू.

डॉक्टरांच्या टीमचे अभिनंदन करताना, 'नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटर'चे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले की, अशा प्रकारच्या प्रगतीमुळे या हृदयविकारावरील उपचारांची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावेल आणि प्रगत रोबोटिक हृदयशस्त्रक्रियेच्या क्षेत्रातील क्षमता अधिक बळकट होईल. रुग्णांना सर्वोत्तम परिणाम मिळवून देण्यासाठी, रुग्ण-केंद्रित आणि तंत्रज्ञान-आधारित आरोग्यसेवेसाठी नवीन परिसीमा ओलांडत आम्ही आणखी प्रगत उपचारांच्या दिशेने वाटचाल करत राहू .

डॉ. दिविज माने म्हणाले की, आज पुणे अत्याधुनिक हृदयरोग उपचारांसाठी जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण करत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तज्ज्ञ शल्यचिकित्सकांद्वारे,या क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केली जाणारी अत्याधुनिक रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया येथेच यशस्वीरीत्या केली जाऊ शकते आणि त्याचे परिणाम जगातील सर्वोत्तम केंद्रांच्या बरोबरीचे आहेत, हे आज आमच्या टीमने दर्शविले आहे. अद्ययावत उपचारांसाठी रुग्णांनी देशाबाहेर जाण्याची गरज नाही; ते अद्ययावत व सर्वोत्कृष्ट उपचार त्यांच्या पर्यंत पोहोचवण्याची आमची वचनबद्धता आहे. हा टप्पा आमच्या ठाम निर्धाराचे प्रतीक आहे. वैद्यकीयदृष्ट्या काय साध्य करणे शक्य आहे, यासाठी सीमा आम्ही सातत्याने विस्तारत राहू. तंत्रज्ञान आणि कौशल्यात अविरत गुंतवणूक करू आणि रुग्ण-केंद्रित, परिणाम-आधारित हृदयरोग उपचारांसाठी नवे मापदंड स्थापित करू.प्रगत हृदय शस्त्रक्रियेसाठी एक प्रमुख केंद्र म्हणून जगाचे लक्ष आता अधिकाधिक पुण्याकडे वळेल, आणि त्या चळवळीचे नेतृत्व करण्याचा आमचा निर्धार आहे.



नोबल हॉस्पिटल्स ॲन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने म्हणाले की, आमच्या हॉस्पिटलमध्ये रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची सुरुवात ही तंत्रज्ञान आणि वैद्यकीय उत्कृष्टतेप्रति आमची वचनबद्धता दर्शवते. ही महत्त्वपूर्ण कामगिरी योग्य नियोजन, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांमुळे आणि आमच्या कुशल बहुशाखीय टीमच्या समर्पणामुळे साध्य झाली आहे.

# सासवडचा संग्राम जगताप ठरला 'पुरंदर केसरी'

## नीरेच्या अली सय्यदवर मिळवला चितपट विजय

**सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था आणि पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित २० व्या 'पुरंदर केसरी' कुस्ती स्पर्धेत सासवडच्या संग्राम जगताप याने मैदान मारले. अंतिम लढतीत त्याने नीरेचा पैलवान अली सय्यद याला चितपट करून 'पुरंदर केसरी २०२६' हा मानाचा किताब पटकावला.

सहकारमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली २६ व २७ एप्रिल रोजी या स्पर्धा पार पडल्या. अंतिम लढतीचे पंच म्हणून ज्येष्ठ मल्ल तात्यासाहेब भिंताडे यांनी काम पाहिले. संग्राम जगताप याला मान्यवरांच्या हस्ते ३५ हजार रुपये रोख, चांदीची गदा, मानपत्र आणि मानाचा किताब देऊन गौरविण्यात आले. तर उपविजेत्या अली सय्यद याला २७ हजार रुपये आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली. सिल्व्हर ज्युबिली मोटर्सच्या वतीने ही बक्षिसे पुरस्कृत करण्यात आली होती.

या सोहळ्याला माजी आमदार संजय जगताप, ज्येष्ठ मल्ल तात्यासाहेब भिंताडे, कामगार केसरी पंडीत साबळे, कामगार केसरी वस्ताद ज्ञानेश्वर मांगडे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर जगताप, यशवंतकाका जगताप, संजय ग. जगताप, नीरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फरतडे, पुरंदर नागरीचे उपाध्यक्ष कृष्णा शेट्टी, संचालक अंकुश जगताप, आनंदराव घोरपडे, राजेश इंदलकर, डॉ. विनायक खाडे, चंद्रकांत बोरकर,बाबासाहेब चौंडकर, सुर्यकांत कांबळे, अनिल कामठे, परशुराम तांबे, अमोल सातभाई, अ‍ॅड. किशोर म्हस्के पाटील, पोपटराव सोनवणे, सोमेश्वरचे संचालक तुषार माहूरकर, उद्योजक मानसिंगभाऊ चव्हाण, प्रकाश पवार, चंद्रकांत खोमणे, गंगाराम जाधव, रफिक शेख, संभाजी काळाणे, संदीप कटके, संजय निगडे, डॉ. मनोज शिंदे, संदीप जगताप, रमेश जगताप, नितीन भोंगळे, चेतन महाजन, माजी पुरंदर केसरी पै. नितीन मोडक, पै. प्रतिक जगताप, पै. रितेश मुळीक, बंटी मोडक, अमित गायकवाड, संदीपबापू जगताप, बाळासो जगताप, रमेश जगताप, ज्ञानदेव दिघे, रमेश मोडक, म्हस्कू दळवी, आण्णा काळे, डॉ. सुमित काकडे, सत्यजित जगताप आणि दिलीप मोरे यांसह हजारो कुस्तीशौकीन उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. राजेंद्र जगताप, सदस्य पै. अशोक झेंडे, तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. पांडुरंग कामथे, सचिव पै. रविंद्रपंत जगताप, सदस्य पै. बाळासाहेब कोलते, पै. विनोद जगताप, पै. अभिजित मोडक, पै. तानाजी काकडे, पै. चंद्रकांत गिरमे, पै. रमेश जगताप, पै. भाऊ मोरे, पै. गुलाब गायकवाड, पै. संतोष सोनवणे, पै. शरद जगदाळे, पै. संतोष काळांगे, पै. हरीभाऊ जेधे, पै. शेखर कटके, पै. तात्या झेंडे, पै. लक्ष्मण दिघे, पै. गणेश मुळीक, पै. रघुनाथ जगताप, पै. विशाल जगताप, पै. संजय क्षीरसागर, पै. माणिक भिसे, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, सतीश शिंदे, हरीभाऊ शिंदे, कानिफनाथ आमराळे, दिपक जगताप, प्रशिक्षक पै. माऊली खोपडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

आंतरराष्ट्रीय पंच रोहिदास आमले यांच्या मार्गदर्शनाखाली तुषार गोळे, अमित म्हस्के, चंद्रकांत मोहोळ, विक्रम पोवळे, गणेश जाधव यांनी पंच म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन रविंद्रपंत जगताप व जालिंदर काळे यांनी केले, तर मानपत्र वाचन प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले.

प्रसिद्ध कुस्ती निवेदन युवराज केचे यांच्या समालोचनाने आणि हलगी सम्राट कोल्हापूरचे राजू आवाळे व टिमच्या हलगी वादनाने मैदानात रंग भरला.



कामगार केसरी व आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक केसरीचे पुरस्कारार्थी वस्ताद ज्ञानेश्वर मांगडे यांनी सत्काराला उत्तर देताना लाल मातीचे ऋण व्यक्त केले. "पुरंदर तालुक्याने माझ्या कामाची दखल घेतली, ही मोठी गोष्ट आहे. ही स्पर्धा उत्तम असून तिचे स्वरूप आणखी वाढत राहो. यासाठी गावोगावी तालीम उभ्या राहिल्या तर मुले घडतील. येथील मुले केवळ स्थानिक पातळीवर न थांबता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली पाहिजेत," अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**- कामगार केसरी, वस्ताद ज्ञानेश्वर मांगडे (पुरस्कारार्थी)**

स्पर्धेचे आयोजक माजी आमदार संजय जगताप यांनी स्पर्धेच्या भविष्याबद्दल ग्वाही देताना सांगितले की, "या स्पर्धेची उंची आम्ही आणखी वाढवू आणि त्यासाठी सर्वांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. ही स्पर्धा संपूर्ण पुरंदर तालुक्यातून सामूहिकपणे भरवली जाते. या मातीतून उद्याचा 'महाराष्ट्र केसरी' घडावा, ही दिवंगत चंदुकाका जगताप यांची मनापासून इच्छा होती. मुलांनी कठोर कष्ट करून महाराष्ट्र केसरीचा मान मिळवावा," अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी खेळाडूंना दिल्या.

**- माजी आमदार संजय जगताप (स्पर्धा आयोजक व अध्यक्ष पुरंदर तालुका कुस्तीगीर संघ)**

### वजन गटनिहाय विजेते आणि उपविजेते

३० किलो: राजवीर काळे (विजेता), कैवल्य भांडवलकर (उपविजेता)
३५ किलो: श्लोक वारे, अवधूत वासवंड
४० किलो: यश भोसले, आदेश मोडक
४५ किलो: सोहम मोटे, समर्थ शेळके
५० किलो: सार्थक दिघे, यश पेटकर
५५ किलो: शिवराज घिसरे, निल सोनवणे
६० किलो: ओम गायकवाड, सोहम हिवरकर
६६ किलो: समर्थ शेडगे, तिर्थराज जाधव
७४ किलो: राहुल कुंभारकर, प्रथमेश ढोणे
खुला गट (पुरंदर केसरी): संग्राम जगताप, अली सय्यद

## थोडक्यात पण महत्वाचे...



### थोरले बाजीराव पेशवे यांचे तैलचित्र राज्याच्या विधानभवनात लावणार

■ थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठान; श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची २८६ वी पुण्यतिथी

पुणे (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रज्वलित केलेली आग हृदयात असल्याने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांनी हिंदुस्थान तलवारीने गाजवला. त्यामुळे अटक ते कटक हे साम्राज्य जिवंत राहू शकले. त्यांचे स्मारक राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत उभे राहिले असून आता पालखेड येथे देखील भव्य स्मारक उभे रहात आहे. त्यासोबतच थोरले बाजीराव पेशवे यांचे तैलचित्र राज्याच्या विधानभवनात लावण्यास प्रयत्न करणार असल्याचे थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्या वतीने सचिव कुंदनकुमार साठे यांनी सांगितले. थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारवाड्याच्या प्रांगणात श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या २८६ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला व प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी समस्त पेशवे कुटुंबीय, पुष्करसिंह पेशवे, नगरसेविका स्वप्नाली पंडित, मिलिंद एकबोटे, ईस्कॉनचे संजय भोसले, इतिहास अभ्यासक मोहन शेटे, प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे, श्रीकांत नगरकर, माधव गांगल, चिंतामणी क्षीरसागर, विश्वनाथ भालेराव, सचिन टापरे, सचिन बोधनी यांसह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मोहन शेटे म्हणाले, ऊन, वारा, थंडी, पाऊस या कशाचीही तमा न बाळगता सैनिकांमध्ये रमणारे थोरले बाजीराव पेशवे हे व्यक्तिमत्व होते. त्यामुळे त्यांना देव योद्धा असेही म्हणतात. अटक ते कटक असे साम्राज्य जिवंत ठेवण्याचा प्रयत्न हा पालखेडची लढाई आणि निजामाचा पराभव यातून अबाधित राहिला. विश्वनाथ भालेराव यांनी सूत्रसंचालन केले.

### बल्लाळवाडी येथे शेततळ्यात बुडून दोन लहान मुलांचा मृत्यू

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बल्लाळवाडी येथे दोन लहान मुलांचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार दि. 28 एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती समोर आली आहे. मृत मुलांची नावे सोहम जयसिंग नवले (वय १२) आणि अभी महेश पवार (१०) अशी असल्याचे समजते. शेतकरी गाडेकर यांच्या शेतातील तळ्यात ही दुर्घटना घडल्याची माहिती मिळाली आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा आणि रेस्क्यू टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली असून संबंधित मुलांचे मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे. दरम्यान, सध्या उन्हाची ताप प्रचंड पडत असल्यामुळे उष्माघात होत आहे. व शाळांना सुट्ट्या लागल्यामुळे शाळेतील मुले विहिरी, शेततळी व कालव्यावर पोहण्यासाठी जात आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी लहान मुलांनी शेततळे किंवा पाण्याच्या साठ्यांमध्ये आंघोळीला जाणे टाळावे.

## जुन्नर तालुक्यात उष्माघातामुळे महिलेचा मृत्यू

**नारायणगाव (दै. संध्या)**

राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. राज्यात अनेक ठिकाणी तापमान 40 अंशाच्या पुढे गेलं आहे. तर काही ठिकाणी तापमान 45 ते 46 अंशावर गेलं आहे. त्यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उष्माघातामुळं काही ठिकाणी नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशातच पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात उष्माघाताचा बळी गेला आहे. शेतात काम करताना कष्टकरी महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा गावमाळा परिसरातील रुपाली गाडगे या सकाळच्या सुमारास शेतात खुरपणीचे काम करत होत्या. याचवेळी अचानक त्यांना उष्माघाताचा त्रास झाला आणि



त्यांची प्रकृती झपाट्याने खालावली. घटनेनंतर स्थानिकांनी तातडीने मदतीचा प्रयत्न केला. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. हे पाहता उष्माघाताने त्यांचा जीव गेल्याचं बोललं जात आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या वेळेत कष्टाची कामे टाळावीत, पुरेसे पाणी प्यावे आणि स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## सह्याद्री स्टार्टअप्सकडून विद्यार्थ्यांसाठी ड्रोन इनोव्हेशन उपक्रम

**पुणे (दै. संध्या)**

'सह्याद्री स्टार्टअप्स'च्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'ड्रोन इनोव्हेशन' उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञान, स्टार्टअप संस्कृती आणि प्रत्यक्ष उद्योगजगताचा अनुभव देण्यात आला. हा कार्यक्रम सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स (Cerebrospark Innovations Pvt. Ltd.) या ड्रोन क्षेत्रातील स्टार्टअपच्या सहकार्याने पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष उद्योगातील कामकाजाची ओळख करून देण्यात आली.




कार्यक्रमादरम्यान कंपनीच्या संस्थापक गणेश थोरात, मिहीर केदार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या उद्योजकीय प्रवासाबाबत माहिती दिली. स्टार्टअप उभारणीतील आव्हाने, संधी आणि ड्रोन क्षेत्रातील वाढत्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ड्रोनची रचना, त्यातील महत्त्वाचे घटक तसेच विविध क्षेत्रांतील उपयोग याची माहिती देण्यात आली. संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांना तज्ज्ञांशी थेट चर्चा करण्याची संधी मिळाली.

या उपक्रमामध्ये संशोधन व विकास प्रयोगशाळेचा (R&D Lab) अनुभवही विद्यार्थ्यांना देण्यात आला. येथे ड्रोनचा वापर सुरक्षा, सर्वेक्षण आणि संशोधनासाठी कसा केला जातो याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ड्रोन उड्डाणाचा प्रत्यक्ष अनुभव. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक विद्यार्थ्याला ड्रोन उडविण्याची संधी देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना नियंत्रण, स्थिरता आणि सुरक्षेचे मूलभूत तत्त्व समजण्यास मदत झाली.

या उपक्रमाबाबत सह्याद्री स्टार्टअप्सचे संस्थापक सलील उरुणकर यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांना प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम आणि उद्योजकतेची प्रेरणा निर्माण होते." विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून हा अनुभव प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही अशा अनुभवाधारित उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस सह्याद्री स्टार्टअप्सने व्यक्त केला आहे.

## मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करू नका!

### प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी स्पष्ट केली पक्षाची भूमिका

**पुणे (दै. संध्या)**

राज्य सरकारने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा घेतलेला निर्णय हा महाराष्ट्राच्या अस्मितेला बळ देणारा आणि मराठी भाषेच्या सन्मानासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. असे असतांना हातावर पोट असलेल्यांना मराठी जरूर शिकवली पाहिजे मात्र, त्यांचे परवाने रद्द करणे योग्य नाही, अशा शब्दात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आ) प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी मंगळवारी (ता.२८) पक्षाची भूमिका स्पष्ट केली.




महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मराठी भाषा लिहिता, वाचता आणि बोलता येणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि मराठी संस्कृतीची भूमी असून येथे राहणाऱ्या आणि उपजीविका करणाऱ्या नागरिकांनी स्थानिक भाषेचा आदर राखला पाहिजे. परंतु, राज्य सरकारने १ मे पासून मराठी भाषा बोलता न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांचे थेट परवाना रद्द करण्याचा घेतलेला निर्णय योग्य नाही, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेला इशारा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेली स्पष्ट भूमिका ही राज्याच्या भाषिक धोरणाची ठाम दिशा दर्शवणारी आहे.भाजपकडून मराठी शिकवणी वर्ग सुरू करून रिक्षा चालकांना भाषा शिकवण्याचा उपक्रम राबविणे हे देखील कौतुकास्पद आहे. आरपीआय देखील रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीचे धडे देईल, असे डॉ.चलवादी म्हणाले. दुसऱ्या राज्यात जाऊन व्यवसाय करताना तेथील भाषा आत्मसात करणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही मराठी भाषेचा सन्मान राखला गेला पाहिजे.केवळ परिवहन क्षेत्रातीलच नव्हे तर राज्यातील प्रत्येक क्षेत्रातील व्यवसायिकांना मराठी यायलाच हवी. मात्र, असे करतांना त्यांचे व्यावसायिक परवाने रद्द करण्याची अट जाचक ठरू नये, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले. राज्यातील जवळपास ८० टक्के परप्रांतियांना मराठी येते, ज्यांना येत नाही त्यांनी मराठी शिकली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.रामदास आठवले साहेबांची असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

राज्य सरकारच्या या निर्णयाचे आरपीआय (आठवले) अंशत: समर्थन करत असून मराठी भाषेच्या गौरवासाठी हा निर्णय प्रभावी ठरेल,असा विश्वासही डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे मूळचे कर्नाटकचे असताना देखील डॉ.चलवादी यांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वाची मा.रामदास आठवले साहेबांनी स्तुती केली होती.

## जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान परीक्षेत मिळविले यश

**पुणे (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील रानमळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मंथन सामान्य ज्ञान परीक्षा 2026 मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत केंद्र जिल्हा व राज्यस्तरावर शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. अशी माहिती मुख्याध्यापिका सुनिता औटी यांनी दिली. इयत्ता पहिलीमध्ये श्रीराज योगेश डेरे 112 गुणांनी केंद्रात तृतीय, जिल्ह्यात 15 वा व राज्यात 20 वा क्रमांक मिळविला. तसेच ओवी प्रमोद गुंजाळ 102 गुण व ओवी स्वप्नील पाडेकर 86 गुणांनी यश संपादन केले. इयत्ता दुसरीमध्ये स्वराज सर्जेराव येवले 128 गुणांनी केंद्रात प्रथम, जिल्ह्यात सातवा व राज्यात बारावा क्रमांक पटकावत विशेष यश संपादन केले.याशिवाय आराध्या विकास गुंजाळ 106 गुण व वरद संजय गुंजाळ याने 104 गुणांनी यश संपादन केले. इयत्ता तिसरीमध्ये दर्शन संतोष गुंजाळ 216 गुण,शर्वरी योगेश डेरे 190 गुण व आर्या बाबा भालेकर 188 गुण मिळविले.



इयत्ता चौथीमध्ये ऋतुजा नितीन गुंजाळ 210 गुण,आद्यश्री जगन्नाथ गुंजाळ 192 गुण,श्लोक संदीप बांगर 176 गुण तसेच स्वराज ताराचंद गुंजाळ 172 गुणांनी यश संपादन केले. या यशाबद्दल मुख्याध्यापिका सुनीता औटी,सहशिक्षक संदीप रेपाळे, सरपंच सविता तिकोणे,माजी सरपंच बाळासाहेब गुंजाळ, दादाभाऊ गुंजाळ,शांताराम गुंजाळ,रानमळा शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# '... तर आपल्या पक्षाचा विस्तार वेगाने करणे हेच उद्दिष्ट' : रामदास आठवले

**पुणे (दै. संध्या)**

रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटांनी आणि आंबेडकर चळवळीतील सर्व घटकांनी एकत्र यावे, यासाठी आंबेडकरी समाज आसुसलेला आहे. त्यासाठी आपण अनेकदा प्रयत्न केले आहेत. मात्र, एकत्रीकरण होणारच नसेल तर आपल्या पक्षाचा वेगाने विस्तार करणे हेच आपल्या समोरचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत केले.



यावेळी शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, मातंग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष अण्णा वायदंडे, मोहन जगताप, शाम सदाफुले, बसवराज गायकवाड, शशिकला वाघमारे, प्रवीण ओव्हाळ, विशाल शेळके, राजेश गाडे, ऋषिकेश गवळी, संजय खडसे, सुनिल जाधव, सुधीर वाघमोडे आदी उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्ष हा सर्व समाज घटकांना एकत्र जोडणारा पक्ष आहे. पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. छत्रपती संभाजीनगरमधील सामाजिक कार्यकर्ते रमेश अण्णा मुळे यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला असून; त्यांच्यावर पक्षाच्या मराठा आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून मराठा आणि दलित समाजाला एकत्र जोडण्याचे पक्षाचे प्रयत्न असतील, असेही आठवले यांनी स्पष्ट केले.

स्वातंत्र्योत्तर काळात समाजात उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. संविधानामुळे समाज एकसंध राहिलेला आहे. त्यामुळेच भारतात नेपाळ किंवा बांगलादेशसारखी अराजकाची स्थिती केव्हाही निर्माण होऊ शकत नाही. मात्र, सामाजिक स्तरावर जातीभेद उठावदारपणे दिसत नसले तरी देखील अद्यापही काही ठिकाणी दलितांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे संपूर्ण परिवर्तनासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली. आम्ही देशाभरात पक्षविस्तारासाठी प्रयत्नशील असलो तरीही महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला सत्तेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही, अशी खंत व्यक्त करताना आठवले यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि विविध महामंडळामध्ये 50 सदस्य पक्षाला मिळावे, अशी आग्रही मागणी देखील आठवले यांनी केली. पुणे येथील आंबेडकर भवन च्या पाठीमागची जागा स्मारकासाठी देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करण्यात यावी, कोरेगाव भीमा येथील विजय स्तंभाजवळ विजय स्मारकासाठी सरकारकडून 200 एकर जागा उपलब्ध व्हावी, अशा मागण्याही आठवले यांनी केल्या. विजय स्तंभाच्या जागेची पाहणी राज्याचा समाज कल्याण विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून झाली असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन स्मारकासाठी जागा अधिग्रहित करावी, असे आठवले यांनी सांगितले. धम्मचक्र दिनी 14 ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेल्या सातारा येथून सामाजिक समरसता मार्च काढण्यात येणार असून तो महाराष्ट्रभर जाईल आणि त्याचा समारोप पुण्यात करण्यात येईल, असेही आठवले यांनी नमूद केले.